# प्रेम हे असंच असतं...



प्रतिक प्रवीण म्हात्रे

# प्रेम हे असंच असतं...

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# प्रेम हे असंच असतं...

प्रतिक प्रवीण म्हात्रे

ई साहित्य प्रतिष्ठान

# प्रेम हे असंच असतं.......

लेखक / संकल्पना / शब्दांकन

प्रतिक प्रवीण म्हात्रे

https://www. facebook. com/pratik. mhatre. 334

Whats app – 8888198850

पत्ता : प्रतिक प्रवीण म्हात्रे,

आगाशी, म्हात्रेवाडी, 'साई प्रतिक निवास',

विरार पश्चिम, तालुका /जिल्हा -पालघर

४०१३०१

ईमेल - infopratikmhatre@gmail.com

पर्सनल ब्लॉग - www.pratikpravinmhatre.wordpress.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन : २५ मार्च २०१८



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

# प्रतिक प्रवीण म्हात्रे



या पुस्तकाचे लेखक श्री प्रतिक म्हात्रे म्हणजे विरारचा छोरा. अवघा २१ बाविस वर्षाचा इंजिनियर. डिप्लोमा प्लस डिगरी. आणि तरीही आवड मराठी साहित्याची. त्याचे बालपण आणि शाळा विरार येथील आगाशीचे. त्यानंतर श्री भगूबाई मफतलाल पॉलिटेकनिक विलेपार्ले येते इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स या विषयात डिप्लोमा पूर्ण केला. आणि नुकतीच विद्यालंकार इन्स्टिटयूट ऑफ टेकनोलॉजि मधून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉमुनिकेशनची डिग्री प्राप्त केली आहे. पण प्रतिक करियर आणि पैशापेक्षा रिलेशनशिपवर जास्त महत्व देतो. मग ते घरचे असोत वा मित्र किंवा वाचक. आणि त्याच्या या वृत्तीचे प्रतिबिंब त्याच्या लेखनात उमटते.

लहानपणापासूनच त्याला वाचनाची आवड आहे. त्यातही ऐतिहासिक कथा आणि कादंबऱ्या मला विशेष प्रिय आहेत. आतापर्यंत त्याने श्रीमान योगी, पावनखिंड, स्वामी, ज्ञानेश्वरी,मृत्युंजय, छावा, रामायण, महाभारत, युगंधर अशी अनेक पुस्तके वाचली आहेत. रणजित देसाई आणि शिवाजी सावंत हे माझे आवडते लेखक आहेत. अशा वाचनाने त्याच्यामध्ये चिंतनशीलता वाढली आहे. आपल्या मनात उमटणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तो स्वतःच्या चिंतनातून शोधायचा प्रयत्न करतो.

त्यातूनच त्याचे ' पर्सनल से सवाल' हे पुस्तक जन्माला आले आणि गेल्याच वर्षी ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े 'प्रकाशित झाले. त्याला वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

आता यावर्षी त्याची "प्रेम हे असंच असतं ' ही सुंदर भावुक कादंबरी सादर करीत आहोत. वाचकांना ती आवडेल याची खात्री आहे. वाचकांच्या प्रतिसादाची आम्ही वाट पाहू.

कृपया आपली मते प्रतिकला कळवा.

त्याचा संपर्क क्रमांक 8888198850 असून infopratikmhatre@gmail.com हा त्याचा मेल पत्ता आहे.

प्रतिक हा सातत्यपूर्ण लेखक आहे आणि आपले लेखन तो नियमित रित्या ब्लॉगवर प्रसिद्ध करत असतो. त्याचा www.pratikpravinmhatre.wordpress.com हा ब्लॉग तुम्हाला नक्की आवडेल.

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

# अर्पणपत्रिका

ज्यांनी मला माझे विचार शब्दांत मांडण्यासाठी,

मला व्यक्त होण्यासाठी प्रवृत्त केले,

वेळोवेळी प्रतिक्रिया देऊन माझ्या  लेखनाचा हुरूप वाढवला

त्या माझ्या हितचिंतकांना अर्पण..

- प्रतिक प्रवीण म्हात्रे

माझ्या दुसऱ्या पुस्तकाच्या निमित्ताने…

आत्ताची पिढी मराठी कथा कादंबऱ्या वाचण्यापेक्षा इंग्रजी कादंबऱ्या वाचण्यावर जास्त भर देते. लहानपणापासून इंग्रजी माध्यमात शिकल्यामुळे त्यांना मराठी वाचण्यात अनेक अडचणी येतात. त्यामुळे जर आपण आपल्या डोळयासमोर घडणाऱ्या, आपण अनुभवलेल्या अशा गोष्टी ज्या माझ्या वयाच्या इतर मुलामुलींनी अनुभवलेल्या असतील त्या गोष्टी एखाद्या आर्टिकलच्या रुपात किंवा एखाद्या कवितेच्या रुपात जर सर्वांसमोर मांडल्या तर त्या वाचण्यासाठी आताची पिढी नक्कीच इंटरेस्ट घेईल हा विचार करून मी लेखनास प्रारंभ केला. माझे लेखन वाचल्यावर काही जणांनी मला माझा ब्लॉग चालू करण्यासाठी सुचवले. ब्लॉगमुळे माझे लेखन अनेक जणांपर्यंत पोहोचले आणि त्यांच्याकडून येणाऱ्या प्रतिसादाचा, सल्ल्याचा मला नेहमीच उपयोग झाला.

हि कादंबरी वाचकांना अर्पण करताना मला फार आनंद होत आहे. आपल्याच वयाच्या अस्मिता आणि अभिमान यांची हि कथा आहे. प्रेम म्हणजे फक्त सोबत राहणं नसून कधीकधी प्रेम निभावण्यासाठी आपल्याला त्या व्यक्तीपासून दूरही राहावं लागतं. असेच अनेक प्रसंग अस्मिता आणि अभिमानच्या आयुष्यात येतात. त्यातून पुढे काय होतं ??? त्यांच्यातलं प्रेम अजून घट्ट होतं कि त्यांच्यात दुरावा निर्माण होतो...हे पाहण्यासाठी तुम्हाला हि कथाच वाचावी लागेल. कथा वाचताना कुठेतरी तुम्ही त्या पात्रांशी स्वतःला नक्कीच रिलेट कराल. ती पात्रं तुम्हाला तुमच्यातलीच वाटतील आणि हि कथा तुम्हाला नक्कीच आवडेल.

प्रतिक प्रवीण म्हात्रे

**या कादंबरीतील सर्व पात्रे व नावे काल्पनिक असून त्यांचा वास्तवातील व्यक्तींशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.**

# प्रेम हे असंच असतं...

संध्याकाळची वेळ होती. पावसाळयाचे दिवस असल्याने आकाश काळया कुट्ट ढगांनी झाकोळून गेलं होतं. ती आपल्याच तंद्रित भरभर चालत होती. तसा आज तिला नेहमीपेक्षा जरा उशीरच झाला होता... ऑफिस मधे अचानक ऑडिट झाल्यामुळे सगळयांना थांबणं भागच होतं आणि त्यात तोसुद्धा आज आला नव्हता. त्यामुळे तिला आज एकटीलाच घरी जावं लागणार होतं. बरं त्याने तो येणार नसल्याचं काही कळवलंही नव्हतं. त्यामुळे रस्त्यावर जमलेल्या पाण्यातून वाट काढत आणि त्याची काळजी करत ती चालली होती.

तिच्या मनात अनेक प्रश्न येत होते.. ‘ बरा असेल ना तो? त्याने कोणाला कळवलं का नाही ? काय झालं असेल?’....

बरं तिने फ़ोन करावा तर सकाळपासून त्याचा फ़ोन पण बंद होता. शेवटी तिने ठरवलं की निदान एक मेसेज तरी करून ठेवू. . बघितल्यावर करेलच तो

रिप्लाय... या विचारातच ती घरी पोहोचली. त्याच्या काळजीने तीचं मन अगदी अस्वस्थ झालं होतं.

संध्याकाळी... संध्याकाळ कसली रात्रच झाली होती आता.... ती एकटीच गच्ची वर उभी होती. तिला कधी nervous वाटलं की ती नेहमी गच्ची वर यायची.. आजही त्यामुळे ती तिथे गेली होती. नंतर आईने हाक मारल्यावर ती खाली गेली आणि मग पडल्या पडल्या कधी डोळा लागला तिचं तिलाही कळलं नाही.

दुसऱ्या दिवशी अस्मिला जाग आली ती डोकेदुखीमुळेचं. . काय झालंय हे दोन मिनिटं तिचं तिलाच कळलं नाही.. नंतर हळूहळू सगळं आठवत गेलं तसा तिने पटकन mobile चेक केला... खुप सारे messages होते पण त्यात त्याचा message नव्हता. ती उठून ब्रश करायला बाथरूमकड़े निघाली.. इच्छा नव्हती.... तरीही.. जाता जाता तिचं आरशात सहज लक्ष गेलं आणि ती थांबली. तशी ती दिसायला नाकीडोळी नीटच होती.. गोरा रंग.. काळेभोर डोळे.. गुलाबाच्या पाकळयांसारखे नाजूक ओठ.... लांबसडक केस... रेखीव देह.. उठावदार उंची... देवाने तिला सुंदर दिसण्यासाठी गरजेच्या सगळया गोष्टी दिल्या होत्या. तिच्या मनात राहून राहून एकच विचार येत होता की ‘काही व्यक्ति आयुष्यात इतक्या महत्वाच्या कशा होऊन बसतात की त्यांच्याशी बोलणं जरी झालं

नाही तरी मनाला रुखरुख लागून राहते'. इच्छा नसतानाही तिने सगळं आवरलं आणि तयार होऊन ती बाहेर गेली... आईची किचन मधे लगबग सुरु होती..

रविवार असल्यामुळे आज सगळे घरी होते. आईने तिच्याकडे पाहिलं.."उठलीस ? मला वाटलं की आज मुडच नाही की काय उठायचा ?? घे कॉफ़ी घे लवकर"

तसा तिचा चहाच लाडका ; पण त्याच्या सोबत कॉफ़ी शेयर करता यावी म्हणून तिने कॉफ़ी ची सवय लावून घेतली होती... त्यांच्या सवयी बऱ्यापैकी भिन्न होत्या.. पण कोणाला एकाला adjust करावंच लागतं ना..... त्यामुळे ती त्याच्या नकळत सगळं adjust करायची.

नंतर मग सगळयांबरोबर बोलताबोलता तिला थोड्यावेळ त्या गोष्टीचा विसर पडला. आणि मग घरात आईला मदत करण्यात, लहान भावाशि खेळण्यात तिचा दिवस निघून गेला.

रात्र झाली होती. दिवसभरच्या कामाने ती अगदी दमुन गेली होती.. तरीही त्याच्या काळजीने तिला झोप येत नव्हती... नुसतीच ती एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळत होती...जबरदस्तीने झोपण्याचा प्रयत्न करत होती. पण तो मात्र तिच्या डोळयासमोरून हलत नव्हता...त्याच्यासोबत घालवलेला प्रत्येक क्षण तिला आठवत होता.....

'अभी.... . तिच्या कॉलेजपासूनचा मित्र.... पहिल्याच भेटीत तो तिला आवडायला लागला होता.. तो ही अगदी तसाच होता. कोणालाही अगदी सहज आवडेल असा... कॉलेजमध्ये तर तो girl's room चा हॉट topic असायचा.. अनेक मुली त्याच्यासाठी वेड्या होत्या.. त्यातली हि एक..

त्याचा फॅमिली backgroundसुद्धा उत्तम होता.. घरचा business.... त्याचे आई बाबा दोघे मिळून तो business सांभाळायचे आणि हा एकुलता एक.. लाडात वाढलेला.. असं असलं तरी त्याच्या श्रीमंतीच त्याला कधीच कौतुक नसायचं. त्याला स्वतःच्या हिमतीवर काही तरी करून दाखवायचं होतं. म्हणून तो हि नोकरी करत होता. '

तिने हि गोष्ट सगळयांपासून लपवून ठेवली होती. पण नशीबाने तिला आणि त्याला एकाच कंपनीमध्ये नोकरी मिळाली. तिला त्याला सांगवसंही वाटायचं पण दुसरं मन तिला थांबवायचं. विचार करता करता तिच्या डोळयाच्या पापण्या मिटायला लागल्या.

ती झोपणार इतक्यात तिचा mobile वाजला. अभी चा मेसेज होता तो....

अस्मि,

‘ तुझे misscalls आणि message आत्ता बघितले. काल अचानक सूचित घरी आला आणि त्याने अलीबागला जायचा प्लान सांगितला. एक कंडीशन ठरवली होती की कोणीही फ़ोन वापरायचा नाही त्यामुळे कोणालाही कळवता आलं नाही... सॉरी.... उद्या भेटु.... goodnight’

Message वाचून तिला जरा बरं वाटलं.. पण तरीही राग होताच.. त्यामुळे तिनेसुद्धा जास्ती काही न विचारता फक्त ‘good night’ एवढचं उत्तर पाठवलं.

दुसऱ्या दिवशी ऑफिसला यायला त्याला जरा उशिरच झाला.. आला आणि तसाच तो बॉसच्या कॅबिन मधे गेला... तिथून बाहेर आल्यावर त्याच्या चेहऱ्यावरचा बराचसा ताण कमी झालेला दिसत होता... बाहेर आल्यावर त्याने सगळयांना इतकंच सांगितलं की तब्येत बरी नव्हती. त्यामुळे नाही आलो ऑफिसला.. आणि अस्मिकड़े बघुन उजवा डोळा मिचकावला.

नंतरचा दिवस उरलेली कामे करण्यातच गेला. संध्याकाळी ऑफिस सुटायच्या वेळी त्यांच्या बॉसने म्हणजे जयने सगळयांना थांबवलं आणि सुचवलं की next weekendला सगळा स्टाफ मिळून कुठे तरी फिरायला जाऊया... बॉस असला

तरीसुद्धा तो हि 30 वर्षाचा असेल. त्यामुळे त्यालाही भटकायला खुप आवडायचं. मग सगळयांच्या संमतिने तांदूळवाडीला जायचं ठरलं..

ऑफिस वरुन निघाल्यावर अभीने तिला विचारलं

“कॉफ़ी ????”

मरीन ड्राइव वरचा सीसीडी त्यांच नेहमीच ठिकाण. . पण आज नेमकं तिला आईबरोबर डॉक्टरकड़े जायचं होतं...देवांगसुद्धा कॉलेज ट्रीपला गेला होता. त्यामुळे तिला घरी जाणं भाग होतं.. तिला राहून राहून सारखं वाटत होतं.

‘अरे यार...या आईला पण आजच डॉक्टरकड़े जायचं होतं का ? त्याने स्वतः हुन विचारलं होतं.. एरवी त्याने विचारावं म्हणून मी किती वाट पाहते आणि आज विचारलं तर हे असं. ... ‘

घर आल्यावर तिने त्याला बाय केलं.. जरा नाराजीतच... तो ही हसला आणि बाइक पळवत दिसेनासा झाला...

**********************************************************************
*******

कधी एकदा रविवार येतो असं तिला झालं होतं... रविवारी ती आपल्या मनातली गोष्ट त्याला सांगणार होती.. तिचं कॉलेजपासूनचं प्रेम ती व्यक्त करणार होती... त्यासाठी कितीतरी तयारी केली होती तिने...

आरशासमोर उभ राहून तेच तेच बोलायची practice केली होती... त्या दिवशी ती सगळं त्याच्या आवडीचं करणार होती.... त्याला आवडणारा तिचा purple colour चा ड्रेस तिने धुवून ठेवला होता.. त्याला आवडणारे बूंदीचे लाडू तिने मुद्दाम आईकडून बनवून घेतले होते.

रविवारची ती अगदी आतुरतेने वाट बघत होती.... शेवटी तो दिवस आलाच.. सगळ्यांनी ऑफिसला भेटायचं होतं. तिकडून सगळे बसने पिकनिकला जाणार होते. ती वेळेवर पोचली. सगळे आले पण अभिचा काही पत्ताच नव्हता.. बस निघायची वेळ झाली तरी अभी आला नव्हता.. त्याचा फोनसुद्धा लागत नव्हता. अस्मीने त्याच्या घरी फोन केला तर त्याच्या आईने सांगितलं कि तो कधीच निघाला आहे घरून... उशीर होत होता म्हणून मग सगळयांनी पुढे निघायचं ठरवलं. अस्मीनेसुद्धा थोड्या नाराजीतच होकार दिला. अभिमान आला तर त्याला बस जिथपर्यंत पोचेल तिथे सोड असं संग्रामला म्हणजे त्यांच्या ऑफिसच्या ड्रायव्हरला सांगून ते निघाले... बस गेट मधून बाहेर पडणार इतक्यात अभिमान ऑटोमधून उतरताना दिसला... अभिमान ऑटो मधून आला म्हणजे याच्या बाईकच काहीतरी झालंय हे समजायला अस्मिला जराही वेळ लागला नाही. पण अभिमानला पाहून तिचा जीव भांड्यात पडला.

बस सिटीच्या बाहेर गेली आणि जयने ड्रायव्हरला उडती गाणी लावायला सांगितली. आणि सगळे एकदम जोशात येऊन नाचायला लागले. अस्मि मात्र एकटीच विंडोसीटवर बसून बाहेरचं निसर्गसौदर्य बघत होती.. सगळ्यांनी तिला नाचण्यासाठी बोलावलं पण ती काही गेली नाही. नंतर मग सगळ्यांनी अभिमानला सांगितलं आणि हि मात्रा बरोबर लागू पडली. ती अभिमानला नकार देऊ शकली नाही. त्याचं मन राखण्यासाठी ती थोडी नाचली खरी पण ती अजिबात comfortable नव्हती.. शेवटी मग अभिमाननेच तिला परत बसायला सांगितल..

तेव्हा मग इशाऱ्यानेच sorry बोलून ती परत तिच्या जागेवर जाऊन बसली. अभिमान नाचता नाचता मध्येच तिच्याकडे पाहायचा.. तिची नजरसुद्धा राहून राहून त्याच्याकडेच जात होती…

सगळे मजामस्ती करत चालले असताना अचानक ड्रायव्हरने ब्रेक मारला.. समोरच्या रस्त्यावर गर्दी दिसत होती. थोडी विचारपूस केल्यावर कळलं कि एका बसचा accident झाला आहे त्यामुळे यांची बस पुढे जाऊ शकत नव्हती.. तांदूळवाडीचा धबधबासुद्धा तिथून काही फार लांब नव्हता…आणि सगळे एकत्र असल्यामुळे चालताना कोणी बोअर होण्याचासुद्धा प्रश्न नव्हता. एरवी चालायचा कंटाळा करणारी अस्मि आज मात्र अभीबरोबर अजून जास्ती वेळ घालवायला मिळणार म्हणून खुश होती.

सगळे खाचखळग्यांमधून वाट काढत काढत तांदूळवाडीच्या धबधब्याजवळ पोहोचले. सुट्टीचा दिवस असल्यामुळे गर्दी जरा जास्तच होती. धबधब्याच्या बाजूने वर चढून जाण्यासाठी एक पायवाट होती. खाली गर्दी असल्यामुळे सगळयांनी वरती जायचं ठरवलं. वाट थोडी अरुंदच होती त्यामुळे उजव्या बाजूला असलेल्या डोंगराच्या कड्याचा आधार घेऊन सगळे चालले होते. अस्मिला थोडी भीती वाटत होती. आणि अभिमान मात्र अनेक ट्रेकचा अनुभव असल्यामुळे एकदम बिनधास्तपणे

चालत होता.. चालता चालता त्याने मागे वळून बघितलं तर अस्मिच्या चेहऱ्यावर भीती एकदम स्पष्टपणे दिसत होती. मग तो थांबला आणि अस्मि जवळ आल्यावर त्याने तिचा हात पकडला. त्याचा आधार मिळताच अस्मिच्या चेहऱ्यावरची भीती किंचित का होईना पण कमी झाली.

जेव्हा सर्वजण वर पोहोचले तेव्हा सूर्य डोक्यावर आला होता.. कधी एकदा पाण्यात शिरतोय असं सर्वांना झालं होतं. सगळयांनी पटापट कपडे बदलले आणि पाण्यात उड्या टाकल्या.. तास दोन तास सगळे जण पाण्यात खेळत होते. एकमेकांच्या अंगावर पाणी उडवत होते, कोण जास्त वेळ पाण्याखाली राहतोय याची स्पर्धा लावत होते, मध्येच कोणाला तरी एकाला टार्गेट करून पाण्याखाली बुडवत होते... अजून थोडा वेळ गेला आणि सर्वांना कडाडून भूक लागली.. तांदूळवाडीला हॉटेल्स नाहीत हे जयला आधीच माहित असल्यामुळे त्याने सर्वांना टिफिन आणायला सांगितल होतं. बुंदीचे लाडू बघून तर अभिमान इतका खुश झाला कि त्याने सगळा डबाच त्याच्याकडे घेतला.. त्याला झालेला आनंद बघून अस्मिसुद्धा मनोमन खुश झाली. खाऊन झाल्यावर सगळयाचं फोटोसेशन चालू झालं.

पाहता पाहता संध्याकाळचे चार वाजत आले. पुन्हा तीन तासाचा प्रवास असल्याने लवकर निघणं भाग होतं. दिवसभर दमल्यामुळे बसमध्ये बसल्यावर

सगळ्यांना लगेच झोप लागली.... जय मात्र ड्रायव्हरसोबत जागा होता. बस ऑफिसला पोहोचली तशी अभिमानला जाग आली.. अस्मि अभिमानच्या खांद्यावर डोकं ठेवून झोपली होती.. नाईलाजानेच त्याने तिला उठवलं.

सगळ्यांसमोर तिला त्याला काही सांगता आलं नाही. पण तिने तो दिवस त्याच्यासोबत enjoy केला. रात्री परतत असतानासुद्धा तो तिला घरी सोडायला आला.

तिला सोडलं आणि तो जायला निघणार इतक्यात तिने त्याला थांबवलं...

“काय झालं ??”

“बऱ्याच् दिवसांपासून तुला काही तरी सांगायचं होतं.. पण कसं सांगू कळत नव्हतं..”

“त्यात एवढा विचार करण्यासारखं काय आहे? सांग ना बिनधास्त...”

“नको...”

इतकं बोलून तिने एक पत्र त्याच्या हातात दिलं आणि मागे वळून न बघता घरात पळाली...

त्या पत्राचं उत्तर तिला दुसऱ्या दिवशी ऑफिस मधे मिळणार होतं.. lunch break मध्ये ती तिच्या कॅबिनेटमध्ये एकटीच होती. ती फेसबुक उघडणार इतक्यात तिला कोणाची तरी चाहूल लागली. तो आला !! तिच्या मनाने एकदम उसळी खाल्ली.. पण तो नव्हता... त्यांच्या ग्रुप मधली मनाली होती. तिला आश्चर्य वाटल.. lunch break संपायला तर अजून वेळ आहे... ही इथे काय करतेय ???..

मनाली एक पत्र घेऊन आली होती. त्याच पत्र... पत्र अस्मिच्या हातात देऊन मनाली निघुन गेली.. आणि ही अधिकच confused झाली... याचा अर्थ काय ?? तिने पत्र उघडलं.. ती पत्र वाचू लागली...

‘अस्मि

काल तू असं अचानक पत्र देऊन गेलीस. दोन मिनिटं मला काही कळलचं नाही.. छान लिहितेस तू... अगदी सहज आणि सोप्या शब्दात... मला असं लिहिता येत नाही.. म्हणून थेट सांगतो.

तूला जे वाटतंय तसं आपल्यात काही होऊ शकणार नाही... तू छान आहेस.. सुंदर आहेस.... एक मैत्रीण म्हणून मलासुद्धा तू तितकीच आवडतेस... पण मी मैत्रीपलीकडे कधी विचार केला नाही आणि आताच्या घडीला मला तो करायचासुद्धा नाही... मला रिलेशन नाही संभाळता येत ग.... SORRY!!! तुला अजुन कोणीतरी बेटर नक्की मिळेल.... ... पण आपली मैत्री कायम राहील याची मला खात्री आहे.. तुझ मन दुखावल्याबद्दल पुन्हा एकदा सॉरी... ‘

अभिमान.

पत्र वाचून क्षणात तिच्या डोळयात पाणी आलं.. पण ऑफिसमध्ये असल्यामुळे तिने कसंबस स्वतःला सावरलं.. आणि ऑफिसच्या कामाकडे लक्ष्य वळवलं.. वेळ जाता जात नव्हती.. एक एक मिनिट तिला एका दिवसासारखा वाटत होता.. कधी एकदाचे 5 वाजतात असं तिला झालं होतं... ऑफिसमध्येच त्या दोघांची बऱ्याचदा नजरानजर झाली पण आता तीच त्याची नजर टाळत होती.... ऑफिस सुटल्यावर ती कोणाचीही वाट न बघता सरळ आपल्या घरी निघाली..

आणि घरी पोचल्यावर तिने बिछान्यावर स्वतःला झोकून दिलं आणि दिवसभर डोळयात साठवलेल्या अश्रुंना वाट मोकळी करून दिली.... . बऱ्याच वेळ ती तशीच पडून होती... या दरम्यान त्याच्या बरोबर घालवलेला प्रत्येक क्षण तिच्या डोळयासमोर येऊ लागला.... .

कॉलेजमध्ये त्यांनी केलेली मस्ती.... . त्याच्या ग्रुपने जिंकलेली डान्स, नाटकाची prizes, त्यानंतरच्या success party मध्ये केलेली धमाल... या सगळयात कॉलेज ची 4 वर्ष कशी गेली हे त्यांना कळलच नव्हतं... फक्त dance, drama मध्येच नाही तर अभ्यासातही त्यांचा ग्रुप हुशार होता.... कॉलेज संपल्यावर काहीजण पुढच्या शिक्षणासाठी बाहेर गेले तर जॉबला लागले.. कॉलेजमध्ये असताना अंकिता तिची bestie होती... तिला तो आवडतो हे अस्मिला सोडून फक्त अंकितालाच माहित होतं..

आज बऱ्याच दिवसांनी तीला तिची खूप आठवण येत होती... तिला सगळं सांगायचं होतं... पण उगाच तिला या सगळयाचा त्रास नको म्हणून तिने फ़ोन करण्याचा विचार बदलला.... .

ती डोळे बंद करुन् झोपण्याचा प्रयत्न करू लागली... तरीही मनात विचार येत होतेच....

काल तांदूळवाडीलाला गेलो होतो तेव्हा किती मज्जा आली होती.... पड़त्या पावसात तोंड वेडीवाकड़ी करुन् काढलेले selfies.... सकाळी नाश्त्याला खाल्लेली गरमागरम भजी.. एकमेकांचा आधार घेऊन चढलेले डोंगरचे कड़े.... सगळं सगळं तिला आठवत होतं..

सकाळी ती नेहमीप्रमाणे उठली आणि त्याची वाट न बघता एकटीच ऑफिसला गेली... आजही तो थोडा लेटच आला... तिला आज ऑफिसमध्ये बघुन त्याला जरा आश्चर्यच वाटल... पण त्याने ते चेहऱ्यावर दिसू दिलं नाही.... तो कामाला सुरवात करणार इतक्यात ऑफिसचा शिपाई संतोष त्यांच्या क्यूबिकलमध्ये आला...

"सर, तुम्हाला आणि अस्मि मॅडमना जय सरांनी बोलावलंय.... ."

"का रे? काय झालं?"

"काही माहीत नाही सर.. ते काही सांगितल नाही मला... फक्त बोलवायला सांगितलय..."

“बरं ठीक आहे... तू चल.. आम्ही आलोच...”

तिनेसुद्धा त्याचं संभाषण ऐकलं होतंच.. त्यामुळे काहीही न बोलता दोघे जयच्या कॅबिनमध्ये गेले...

“अरे !!! आलात तुम्ही... बसा..”

“काय झालं सर ??? काही प्रॉब्लम झालाय का??”अभिने जरा टेंशनमध्येच विचारलं.

“नाही रे... प्रोब्लेम कसला.... . उलट good news आहे... आपल्या कंपनीला खुप मोठ प्रोजेक्ट मिळतंय.... उद्याच् त्याची मीटिंग आहे.. आणि मला असा वाटतंय की तुम्ही दोघांनी मिळून हे प्रोजेक्ट सांभाळावं....”

“पण सर.... एवढ मोठ प्रोजेक्ट आणि आम्ही दोघंच.... ..”

“मग काय झालं... माझा तुम्हा दोघांवर पूर्ण विश्वास आहे... तुम्ही एकदा का प्रोजेक्ट हातात घेतलं कि ते पूर्ण होणारच...”

“पण सर.... .”

“आता पण नाही आणि बिण नाही... उद्याच्या presentationसाठी लागणाऱ्या सगळया details तुम्हाला mail केल्या आहेत.... आणि हे प्रोजेक्ट

आपल्या companyसाठी खूप महत्वाच आहे.. So... लागा कामाला.. All the very best...."

तिला क्षणभर हसावं की रडावं हेच कळत नव्हतं... ती जितकी त्याच्यापासून दूर जायचा प्रयत्न करत होती तितकच तिचा नशीब तिला त्याच्या जवळ नेत होतं....

"अस्मि...."

"हं.... ."

"सरांनी जो मेल केलाय ना त्यावरुन मी presentation बनवतो.. बाकी ते decoration च काम तू करशील???"

"हो.."

"मी ppt बनवून तुला forward करतो.."

"ठीक आहे..."

"अस्मि..."बोलता बोलता अभिमान मध्येच थांबला आणि मग अस्मिच्या नजरेला नजर भिडवत म्हणाला"तू नक्की comfortable आहेस ना माझ्याबरोबर काम करायला... नसशील तर मी सरांना सांगून तुझ्यासोबत कोणा दुसऱ्याला हे प्रोजेक्ट द्यायला सांगतो.."

"अरे नाही त्याची काही गरज नाही... आपली personal आणि professional लाइफ वेगळी ठेवावी ते तूच सांगितलय ना मला..."

अस्मिच्या बोलण्यातला तुटकपणा त्यालाही जाणवत होता.. पण पर्याय नव्हता..

ऑफिस सुटायच्या वेळेला तो पुन्हा अस्मिताजवळ आला..

"अस्मि... मेल केलाय.. check कर...."

"बरं.."

"आणि उद्या लवकर ये ऑफिस ला.. मी घ्यायला येऊ का तुला??.."

"नको... मी येईन वेळेवर...."

'हे सांगायची गरज खरंतर तुला आहे.. तूच नेहमी लेट करतोस.. ' ती मनात म्हणाली.

ते दोघे घरी जायला निघणार एवढ्यात त्यांना जयने बोलावलं.

"अरे.. sorry sorry... घरी निघालात का??"

“हो म्हणजे presentation बनवून झालं तर म्हटलं घरी जाऊन थोडी तयारी करू...”

“presentation झालंसुद्धा.. वाह... शाबास.... .. मी तुम्हाला एवढंच सांगण्यासाठी बोलावलं होतं कि उद्या तुम्ही direct client कडे जा... सकाळी ऑफिसला यायची गरज नाही. okay.... चलो.. bbye.. आणि उद्यासाठी all the very best..”

************************************************************************

आज दुपारी त्यांना जरा उशिरच झाला client कडून निघायला... त्यात पाऊस इतका होता की मुंबई ची lifelineसुद्धा लेट.. म्हणून त्यांनी अजून थोडा उशीर होईल हे सांगायला जयला फ़ोन केला..

“हॅलो..”

“हॅलो सर.. अभिमान बोलतोय...”

“हं बोल अभिमान.. कशी झाली मीटिंग??”

“सर मीटिंग खुप छान झाली.. ते एक दोन दिवसात त्यांचा निर्णय कळवणार आहेत..”

“बरं..”

“सर मी फ़ोन एवढयासाठी केला होता की इकडे पावसामुळे trains लेट आहेत.. त्यामुळे आम्हाला ऑफिसला यायला जरा उशीर होईल..”

“अरे नको.. त्याची काही गरज नाहीये.... तसंहि आता दोन वाजलेत.. त्यामुळे तुम्ही ऑफिसला नाही आलात तरी चालेल आज... आपण नंतर बोलू आजच्या मीटिंगबद्दल...”

“ठीक आहे सर..”

“ओके.. चलो बाय.. take care...”

अभिमानने फोन ठेवला आणि अस्मिकडे पाहिलं... अस्मि तिच्याच विचारात गुंग होती.. समोर काय चाललय याकडे तिचं लक्षच नव्हतं.. अस्मीची अवस्था पाहून अभिमानलासुद्धा वाईट वाटत होतं. तिच्या या अवस्थेला कुठेतरी आपणच जबाबदार आहोत हि सल त्याच्या मनात होतीच.. अभिमानने दोनदा हाक मारल्यावर तिने त्याच्याकडे बघितलं.

“सर बोलले की आज ऑफिसला नाही आलात तरी चालेल...”

“ठीक आहे.. मग मी निघते घरी..”

“अग अजुन lunchसुद्धा नाही केलं आपण.. मला तर खुप भूक लागलिये...”

“मी... घरी जाऊन करेन..”

“माझ्या बरोबर केलास तर काही बिघड़णार आहे का. ?”

“अरे actually मला आईबरोबर बाहेर जायचंय.. म्हणून बोलले.. बाकी काही नाही..”

“बरं.. lunch नाही... निदान कॉफ़ी तरी घेशील..”

आता मात्र अस्मि त्याला नकार देऊ शकली नाही.. सारखं सारखं त्याला टाळणं तिलासुद्धा बरोबर वाटल नाही.. त्यांच्यात जे काही चाललं होतं त्यात त्याचीसुद्धा काही चूक नव्हती म्हणा.... चूक कि त्या वेळेची होती..

दोघेही जवळच्याच एका कॉफ़ीशॉपमध्ये गेले...

“अस्मिता.... मला बोलायचं होतं थोडं..”

“बोल ना..”

“अस्मिता.... सगळं ठीक आहे ना आपल्या मैत्रीमध्ये.. ?”

“हो... पण असं का विचारतोय तू?”

“सोमवारपासून पाहतोय मी.. तू पुर्वीसारखी बोलत नाहीस... माझी मस्करी करत नाहीस.. मनमोकळेपणे हसतसुद्धा नाहीस.... तूटकपणे वागतेस.. आपण मित्र आहोत ना अजुन???”

"अरे हो.... हा काय प्रश्न झाला का... जे झालं ते झालं... त्यातून सावरायला मला थोडा वेळ लागेल इतकंच..."

"नक्की ना...."

"हो रे..."

तिच्याशी बोलून त्याला जरा बरं वाटलं... त्याच्या मनावरचा ताण थोडा हलका झाला. दोन दिवसांपासून त्याची जी घुसमट होत होती ती जरा कमी झाली....

' काय कमी आहे तिच्यात... सुंदर आहे.. हुशार आहे.. आणि महत्वाच् म्हणजे मला किती समजून घेते ती.... पण आपण तिच्याकडे त्या नजरेने कधी पाहिलंच नाही तर त्या feelings कशा येणार ना... मला थोडा वेळ नको का द्यायला... प्रेम, लग्न या सगळ्या गोष्टी माझ्यासाठी कधीच महत्वाच्या नव्हत्या... एकदा businessमध्ये लक्ष द्यायला सुरवात केल्यावर हिच्याकड़े लक्ष द्यायला मला कुठे वेळ मिळणार आहे... सगळ्या गोष्टीचा विचार करायला हवा ना... असं लगेच कसं हो बोलता येईल... नंतर त्याचा तिलाच त्रास नाही का होणार... आताही माझ्या नाही बोलण्याचा किती त्रास झालाय तिला.. ती तो दाखवत नसली तरी कळतच ना.... त्यात आता हे प्रोजेक्ट मिळालंय म्हणजे अजुन मनस्ताप तिला... बघू काय होतं... वेळच काय ते ठरवू शकते... '

दुसऱ्या दिवशी अस्मि ऑफिसमध्ये आली तेव्हा अभिला ऑफिसमध्ये पाहून तिला धक्काच बसला. कधीही लवकर न येणारा मुलगा आज सर्वात आधी कसा काय येऊन बसलाय. . तिला आश्चर्यच वाटलं. पण तिने ते दाखवलं नाही. फक्त त्याला एक छोटी स्माईल देऊन ती कॉफी प्यायला निघून गेली. ती जशी परत आली तसा अभिमान तिला म्हणाला..

“अस्मि... जय सरांकडे जायचं ना... त्यांना कालच्या मीटिंगचे अपडेट द्यायचे आहेत...”

“हो.... चल जाऊ...”अस्मि प्रसन्नपणे म्हणाली. तिच्या बोलण्यावरून तरी आज तिचा मूड जरा बरा वाटत होता. ते पाहून अभिमानला जरा बरं वाटलं..

“जय सर.... . आत येऊ का ??”

“अरे अभिमान.. ये ना.... अस्मि कुठेय...”

“ही काय आहे मागेच...”

“या या... बसा....”

“सर कालची मीटिंग खूप छान झाली.. त्यांना presentation खूप आवडलं.. आपल्या कंपनीचे आधीचे प्रोजेक्ट्स पण पाहिलेत त्यांनी... ते म्हणाले कि आम्ही आमच्या सिनिअर्सशी बोलून सांगतो..”

“अच्छा... चालेल.. काही नाही रे.. मला खात्री आहे कि हे प्रोजेक्ट तुम्हालाच मिळणार.... सो कामाला लागा तुम्ही.. एकदा का प्रोजेक्ट चालू झालं कि तुम्हाला थोडीही उसंत मिळणार नाही... आणि हे प्रोजेक्ट आपल्या कंपनीसाठी

किती महत्वाचं आहे हे तुम्हाला वेगळं सांगायला नकोच... मी कळवतो तुम्हाला त्यांचा मेल आल्यावर.."

"ठीक आहे सर.... . येऊ आम्ही???"

"हो... all the best.."

अस्मिता आणि अभिमान दिवसभर नुसते बसून होते. जोपर्यंत त्या कंपनीचा मेल येत नाही तोपर्यंत त्यांना काही काम नव्हत... त्यांच्यात जर तो awkwardness नसता तर त्यांना कधीच बोअर झालं नसतं... मनात असूनसुद्धा दोघं एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलत नव्हते. मध्येच त्या दोघांची नजरानजर व्हायची पण मग नंतर दोघेही पटकन दुसरीकडे बघत असल्याचं भासवायचे. त्या दोघानाही ते सहन होत नव्हतं पण सर्वकाही निट व्हायला त्यांना अजून थोडा वेळ द्यावा लागणार होता.

संध्याकाळी अभिमान घरी जायला निघणार इतक्यात त्याचा मोबाईल वाजला.... जय सरांनी मोबाईलवर मेसेज केल्याचं बघून त्याला जरा आश्चर्यचं वाटल...

"अभिमान.... . अभिनंदन.... आपल्याला प्रोजेक्ट मिळालंय... उद्या किंवा परवा तुम्हाला त्यांना परत भेटावं लागेल... आता ज्या काही formalities असतील

त्याबद्दल ते direct तुमच्याशीच बोलतील... पुन्हा एकदा अभिनंदन... अस्मिलासुद्धा अभिनंदन सांग..”

अभिमानने आजूबाजूला पाहिलं तर अस्मि नव्हती.. ती कधी घरी गेली त्याला कळलंच नाही... त्याने प्रोजेक्ट मिळाल्याचं तिला मेसेज करून कळवलं आणि तोसुद्धा घरी जायला निघाला.

नंतरचे दोन दिवस त्या प्रोजेक्टच्या formality मध्ये गेले.. त्या दरम्यान अस्मिता बऱ्यापैकी सावरली होती. काही घडलंच नाही असं वर वर दाखवून तिने पुन्हा पहिल्यासारखं वागायला सुरुवात केली. Client साईड प्रोजेक्ट असल्यामुळे त्या दोघांना त्यांच्याच ऑफिसमध्ये बसावं लागत होतं.. आणि तिकडे दुसरं कोणी ओळखीचं नसल्यामुळे त्या दोघाना एकमेकांशी जुळवून

भाग होतं. प्रोजेक्टचे दिवस भराभर निघून जात होते.. अस्मिता अभिमानचंसुद्धा आता एकमेकांशी पहिल्यासारखं जमत होतं... भूतकाळ मागे सारून त्यांची मैत्री पुन्हा एकदा पहिल्यासारखी होऊ पाहत होती. पण म्हणतात ना कि चांगल्या गोष्टींचा आनंद फार काळ कधीच टिकत नाही... सगळं काही सुरळीत चालू होतं आणि एक दिवस अचानक.... .

“Hello.... ..”

“Hello.... कोण बोलतंय.... .”

“मी सदानंद रेगे बोलतोय.... . हा फोन ज्यांचा आहे त्या बाईंचा कर्वे रोडवर अपघात झाला आहे... आम्ही त्यांना जवळच्याच एका हॉस्पिटलमध्ये घेऊन जात आहोत.. तर तुम्ही प्लीज त्यांच्या घरच्यांना कळवू शकाल का??”

“मी त्यांचा मुलगा बोलतोय... क क क कुठल्या हॉस्पिटलला नेत आहात तुम्ही??” बोलताना अभिमानचे शब्दसुद्धा अडखळत होते..

“इथे जवळच संजीवनी हॉस्पिटल आहे.. तुम्ही तिकडे या....”

“हो.... . मी पोहोचतोच....”

फोन बंद करून अभिमान मटकन खाली बसला... अस्मीने त्याला सावरलं.. ती काही बोलणार तोच अभिमानला भोवळ आली आणि त्याची शुद्ध हरपली.. अस्मिसाठी हे नवीन नव्हतं... अभिमानला बऱ्याचदा मध्ये मध्ये चक्कर यायची... डोकं एकदम दुखायला लागायचं... पण त्याने ते कधीच सिरीयसली घेतलं नाही.... थोडा वेळ आराम केल्यावर त्याला बरं वाटायचं. अभिमान बेशुद्ध झाल्यामुळे आजूबाजूच्या लोकांची धावपळ सुरु झाली.. पण अस्मीने हिम्मत दाखवून त्याला त्याच्या तोंडावर पाणी शिंपडून त्याला शुद्धीवर आणलं. शुद्धीवर येताच तो अस्मिला म्हणाला

“अस्मि.... आईचा accident झालाय... तिला कर्वे रोडला कोणतं तरी हॉस्पिटल आहे तिथे घेऊन जातायेत ते.... बाबा पण मीटिंगसाठी अमेरिकेला गेलेत.... . इथे कोणीच नाहीये....”

“हो.... . तू काळजी नको करूस.... आपण निघूया लगेच... काकूंना काहीही होणार नाही.... चल...”

तिने अभिमानला धीर दिला खरा पण मनातून तिलासुद्धा फार भीती वाटत होती. पण अभिमानला सावरण्यासाठी तिला थोडंसं कणखर होणं भाग होतं. अभिमानची बाईक कंपनीमध्येच ठेवून ती त्याला जबरदस्तीने ऑटोने घेऊन गेली.. आधीच एक विघ्न झालंय त्यात तिला रिस्क घायची नव्हती. ते दोघे पोहोचले तेव्हा अभिच्या आईच ऑपरेशन चालू होतं.. अभिला फोन केल्यावर त्या फोनवर त्यांच्या कंपनी मधल्या प्रसादचा फोन आला होता.. जेव्हा अभिमानचे वडील परदेशी असायचे तेव्हा प्रसादच त्यांचे सगळे व्यवहार सांभाळायचा.. त्याला सगळं कळल्यामुळे तो तातडीने हॉस्पिटलमध्ये पोहोचला आणि नर्सने सांगितल्याप्रमाणे तो त्याच्या मित्रांना कॉन्टॅक्ट करून ब्लडची काही व्यवस्था होतेय का ते पाहत होता. रक्तस्त्राव बराच झाल्याने अभिमानच्या आईला रक्त चढवणं भाग होतं.. आणि अभिमानच्या आईचा रक्तगट ‘ओ positive’ असल्यामुळे त्या रक्तगटाचं रक्त त्या हॉस्पिटलमध्ये उपलब्ध नव्हतं.. प्रसादने त्यांच्या नेहमीच्या हॉस्पिटलमध्ये कॉल करून घडल्या प्रकारची कल्पना दिली होती.. पण वेळेचं भान ठेवत त्यांच्या डॉक्टरने त्यांना तिथेच त्यांच्या आईचे उपचार करायला सांगितले.. आणि डॉक्टर स्वतः तिथे यायला निघाले होते. अभिमान आणि अस्मिता जेव्हा हॉस्पिटलमध्ये आले तेव्हा प्रसादला टेन्शनमध्ये पाहून अभिमानाने विचारलं..

“प्रसाद... काय झालं ??कशी आहे आईची तब्येत....”

“हे बघ अभि.. तू काही काळजी करू नकोस... डॉक्टर आईला तपासतायेत... सध्या तरी त्यांनी ब्लडची सोय करायला सांगितली आहे.. मी बघतो काय करायचं ते...”

“पण आपण आईला आपल्या नेहमीच्या हॉस्पिटलमध्ये शिफ्ट करायचं का...”

“अभि आपल्याकडे वेळ नाहीये तेवढा.. मी आपल्या डॉक्टरांशी बोललोय... ते इकडेच यायला निघालेत... फक्त आपल्याला ब्लड मिळत नाहीये....”

“आईचा ब्लडग्रुप पण असा आहे ना.. सगळयांना रक्त देऊ शकते पण सगळयांकडून घेऊ शकत नाही...”

“काकूंचा ब्लड ग्रुप कोणता आहे... ??”अभिमानचं बोलणं ऐकून अस्मिने विचारलं.

“ओ पोसिटीव्ह...”

“अरे... मग कशाला बाहेर शोधताय... माझा आहे की ब्लड ग्रुप ओ पोसिटीव्ह...”

अस्मिने सांगताच प्रसाद आणि अभिमान दोघांचेही चेहरे खुलले.. प्रसादने लगेच डॉक्टरांना सांगितलं आणि अस्मिला मध्ये पाठवलं.

जवळपास तीन तास ऑपरेशन चालू होतं आणि पूर्ण तीन तास अस्मि अभिमानच्या बाजूला बसून त्याला धीर देत होती. डॉक्टर ऑपरेशन करून बाहेर आले तसा अभिमान डॉक्टरांच्या दिशेने धावला.. त्याच्या पाठोपाठ अस्मिसुद्धा गेली..

“डॉक्टर.... . काय झालंय आईला.... कशी आहे आता ती...”

“हे बघा... तुम्ही पहिले शांत व्हा... तुमच्या आईची तब्येत अगदी ठणठणीत आहे .... काळजी करण्यासारखं काही कारण नाही. ऑपरेशन अगदी व्यवस्थितपणे पार पडलय...”

डॉक्टरांचं बोलणं ऐकून अस्मीने सुटकेचा नि:श्वास टाकला... डॉक्टरांनी प्रसादकडे पाहिलं आणि त्याला केबिनमध्ये येण्याचा इशारा केला... अभिमानच्या खांद्यावर हात ठेवून डॉक्टर त्यांच्या केबिनमध्ये गेली आणि त्यांच्या पाठोपाठ formalities पूर्ण करण्याच्या नावाखाली प्रसाद्सुद्धा गेला..

“Mr. प्रसाद.... तुमच्यापासून मी काही लपवणार नाही... बाहेर त्यांच्या मुलाची तब्येत जरा नाजूक वाटली म्हणून मी बाहेर काही बोललो नाही पण घरातल्या कोणालातरी या गोष्टीची कल्पना असणं आवश्यक आहे..”

“काय झालंय डॉक्टर... अगदी निसंकोचपणे सांगा...”

“त्यांच्या मेंदूला मार लागला आहे... मेंदूच्या काही नसा दाबल्या गेल्यामुळे त्यांना पूर्वीप्रमाणे जास्ती ताण घेता येणार नाही.... कुठल्याही गोष्टीचं जास्त टेन्शन घेता येणार नाही... त्या बऱ्या होतील पण तुम्हाला त्यांची काळजी घ्यावी लागेल..”

“त्याची टेन्शन तुम्ही घेऊ नका डॉक्टर... आम्ही त्यांची अगदी व्यवस्थित काळजी घेऊ...”

“मग काही हरकत नाही.... आजचा’ दिवस तुम्हाला त्यांना भेटता येणार नाही.... त्या शुद्धीवर आल्यावरसुद्धा त्यांना आरामाची आवशकता आहे... उद्या तुम्ही त्यांना भेटू शकता... मी सिस्टरकडे काही औषधं लिहून दिली आहेत तेवढी मागवून घ्या प्लीज...”

“हो मी लगेच आणतो.... Thank You डॉक्टर..”

डॉक्टरांचं बोलण ऐकून प्रसादलासुद्धा जरा वाईट वाटलं. कारण अभिची आई प्रसादला त्याच्या आईसारखीच होती. फक्त प्रसादलाच नाही तर ऑफिसमधल्या सगळयांना अभिमानच्या आईबद्दल आपुलकी होती.. ती त्यांच्या संपूर्ण स्टाफला एक कुटुंब मानायची.. सगळयांच्या अडीअडचणी समजून घायची... सगळयांना वेळोवेळी मदत करायची... सगळयांना तिने प्रेमाने जोडून ठेवलं होतं..

*********************************************************

रात्र झाली तरी अभिमान घरी जायला तयार नव्हता... त्याला प्रसादने खूप समजावलं पण अभिमानने त्याचं काहीही ऐकलं नाही.. अस्मिनेही त्याला समजवायचा प्रयत्न केला पण त्याने उलट अस्मिलाच घरी जायला सांगितलं.. पण अभिमानला अशा अवस्थेत सोडून जायला अस्मिचं मन तयार नव्हतं.. म्हणून मग आज घरी यायला जमणार नाही हे सांगायला अस्मीने घरी फोन केला..

“Hello आई....”

“हं अस्मि... कुठे आहेस तू.. ?? बाबा कधीपासून वाट बघतायेत तुझी..”

“अग आई... ऐक तरी... तेच सांगायला फोन केला आहे मी.... मला आज घरी यायला नाही जमणार...”

“का ??? काय झालं... कोणाकडे nightout आहे का ???”

“अगं नाही.... अभिमानच्या आईचा अपघात झालाय.... संध्याकाळीच ऑपरेशन झालं त्याचं..”

“अभिमान म्हणजे तोच ना जो कधी कधी तुला सोडायला घरी येतो तो...”

“हो... तोच..”

“अरे देवा.... . कशी आहे आता त्याच्या आईची तब्येत....”

“आता बऱ्या आहेत त्या... पण अजून शुद्धीवर नाही आल्यात... त्यात अभिमानची तब्येतसुद्धा जरा बरी नाही.. म्हणून थांबते मी इथे...”

“हो ठीक आहे... थांब... पण काहीतरी खाऊन घे.. आणि त्यालासुद्धा काहीतरी खायला दे.... समजलं.. काही वाटलंच तर फोन कर... बाबा येतील...”

“हो.. ठीक आहे.. ठेवू फोन ??”

“हो... काळजी घे... ठेवते...”

अस्मीने फोन ठेवल्यावर अभिमानने तिच्याकडे पाहिलं.. तिने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

“अस्मि... तू उगाच थांबलीस... मी आणि प्रसाद होतो ना इथे... तू घरी जायला हवं होतं..”

“असू दे रे... त्यात काय एवढ... काकूंजवळ कोणीतरी लेडीज असायलाच हवं न.... माझ्यावर कधी' प्रसंग आला असता तर तू थांबला असताच कि माझ्या जवळ...”

“Thank You...”अभिमान याहून जास्ती काही बोलू शकला नाही... त्याला एकदम गहिवरून आलं.. त्याच्या डोळयात चटकन पाणी आलं.. तो काही बोलत नव्हता पण त्याचे डोळे बरंच काही सांगून जात होते... त्याला तशा अवस्थेत बघून अस्मिच्या हृदयात कालवाकालव झाली.... तिने त्याला एकदम जवळ घेतलं... बराच वेळ तो तिच्या खांद्यावर डोकं ठेवून बसून होता. प्रेयसी म्हणून नाही

तर एक मैत्रीण म्हणून आपलं कर्तव्य व्यवस्थितपणे पार पडल्याचं समाधान अस्मिच्या चेहऱ्यावर होतं.

संपूर्ण रात्र अस्मि, अभिमान आणि प्रसाद बाहेरच बसून होते. अभिमान मध्येच उठून त्याच्या आईला ज्या रूममध्ये ठेवलं होतं तिकडे जाऊन दरवाज्याला असलेल्या काचेमधून आईचा चेहरा बघत होता. नेहमी हसरा असणारा चेहरा पार पार कोमेजून गेला होता. चेहऱ्यावरचं ते हास्य कुठे तरी लुप्त झालं होतं. मध्येच ती डोळे किलकिले करून आजूबाजूला पाहत होती, आपलं कोणी दिसतंय का म्हणून शोधत होती. कोणी दिसत नाहीये हे समजल्यावर नाईलाजाने पुन्हा डोळे मिटून घेत होती. अभिमान मात्र बाहेर उभा राहून हे सर्व पाहत होता.. अगदी हतबल होऊन....

जशी सकाळ झाली तसं प्रसादने अस्मिता आणि अभिमानला जबरदस्तीने घरी पाठवून दिलं. सुरुवातीला अभिमान ऐकायला तयारच नव्हता पण मग अस्मीने समजावल्यावर तो घरी जायला तयार झाला. नंतरचे दोन दिवस ऑफिसला सुट्टीच होती. त्यामुळे निदान ऑफिसच्या कामाचं तरी काही टेन्शन नव्हतं. एकदा डॉक्टरांशी बोलून अस्मि आणि अभिमान घरी जायला निघाले.

“अभी... तू जाशील ना घरी एकटा... कि मी येऊ सोडायला??”

“अगं जाईन मी.... बाईकला किक मारली कि पोचलो...”

“अभी.... . तुझी बाईक ऑफिसमध्येच आहे... विसरलास का....”

“अरे हो.... लक्षातच नाही आलं.. काही हरकत नाही... ऑटोने जाईन...”

“बरं... नीट जा... आणि काळजी घे स्वतःची... जास्ती कसला विचार नको करत बसू...”

असं म्हणून तिने ऑटोवाल्याला आवाज दिला.. अभिमानला ऑटोमध्ये बसवलं आणि त्याची ऑटो दिसेनाशी झाल्यावर तिने ऑटो पकडली.

अभिमान घरी आला पण एकटेपणा त्याला सहन होत नव्हता.. एरवी घरात पाउल ठेवताच ‘आलास का ?? हातपाय धुवून घे... मस्त गरमागरम कॉफी करते तुझ्यासाठी... ‘ असा नेहमी होणारं स्वागत आज नव्हतं. हळूहळू सगळं आवरून तो त्याच्या रूममध्ये बसला.. बाजूच्याच टेबलावर असलेला त्याचा त्याच्या आईबाबांसोबतचा फोटो हातात घेऊन तो त्या फोटोकडेच पाहत बसला.. तिच्यासोबत घालवलेले सगळे क्षण त्याच्या डोळयासमोर येऊ लागले... बराच वेळ तो तसाच बसून होता.... तेवढ्यात त्याचा मोबाईल वाजला आणि त्याची तंद्री भंगली... त्याने फोन उचलला आणि समोरून एक प्रसन्न आणि एकदम energetic आवाज आला..

“Hey handsome... what’s up ?????”

“बाबा.... ..”बोलता बोलता अभिमान अचानक थांबला. थोडा आवाज ठीक करून मग तो पुन्हा म्हणाला.

“काय बोलताय??? कसे आहात तुम्ही... आणि तिकडे कसं चाललय सगळं...”

“एकदम मस्त... अजून एक आठवडा इथे थांबावं लागेल... मग आपल्या घरी परत.. खूप कंटाळा येतो रे इथे.... इकडचं जेवण काय जमत नाही बघ मला... तुझ्या आईच्या हातच्या जेवणाची खूप आठवण येते... आता घरी आलो कि मग आठवडाभर घरीच राहणार मी... रोज तुझ्या आईला काहीतरी नवीन करून खायला घालायला सांगणार...”

“हो.. चालेल... लवकर या तुम्ही घरी... मी... आम्ही सगळे तुमची वाट पाहतोय..”

“येस... अरे पण तुझी आई कुठे आहे... कालपासून फोन करतोय मी पण तिचा फोनच लागत नाहीये...”

आता या प्रश्नांच काय उत्तर द्यावं क्षणभर अभिमानला सुचलंच नाही.... त्याला वाटत होतं कि खरं काय आहे ते सांगून टाकावं... पण मग लगेच त्याने विचार बदलला.. बाबा उगाच तिकडे टेन्शन घेत बसतील... पुढच्या आठवड्यात येणारच आहेत न इकडे... तोपर्यंत आईसुद्धा घरी परत येईल कदाचित.... बाबांना आता काही नको सांगायला.. म्हणून मग स्वतःला सावरून तो म्हणाला.

“अहो तिची कोणती तरी मैत्रीण आजारी आहे... तर कालपासून ती तिच्याच जवळ आहे... तिचा मुलगा परदेशात आहे आणि इथे तिचं कोणीही नाहीये... आणि आईची सवय तर तुम्हाला माहितीच आहे.. कोणी अडचणीत असलं कि ती त्यांना मदत केल्याशिवाय शांत बसते का....”

“हो... ते पण आहेच म्हणा... बरं तिला सांग मी विचारत होतो म्हणून...”

“चल ठेवतो फोन.... सी यु सून...”

“बाय बाबा.... काळजी घ्या...”असं म्हणून अभिमाननेसुद्धा फोन ठेवून दिला.. बाबांची बोलल्यामुळे त्याला जरा बरं वाटलं.

नंतर थोड्याच वेळात त्याला अस्मिचा फोन आला..

“हॅलो अभि...”

“हं.... बोल ना...”

“काही खाल्लं तू???”

“हो अगं... आताच मनोहर काकांनी नाश्ता आणून दिला होता.”

“त्यांनी आणून दिला होता ठीक आहे.. पण तू तो संपवलास का ?”

“भूक नाहीये मला अस्मि...”

“वाटलंच होतं मला.. थांब मीच येते तिकडे...”

“अगं अस्मि... तू कशाला उगाच त्रास करून घेतेय.... आधीच काल पूर्ण रात्री जागी होतीस तर त्याचा त्रास होईल तुला..”

“काही त्रास वगैरे होत नाही.. मी येते... मग आपण तुझ्या घरून हॉस्पिटलला जाऊ....”

“तुला सांगून तू काही ऐकणार नाहीस... तुला हवं तेच तू खरं करणार... बरं... ये... दुसरं काय बोलणार मी आता...”

“काहीही बोलू नकोस... आले मी...”असं म्हणून अस्मिने घाईघाईने फोन ठेवला आणि आईला सांगून ती घरातून बाहेर पडली. अस्मिता अभिमानाची मैत्री माहीत असल्यामुळे तिच्या आईनेसुद्धा फार काही प्रश्न विचारले नाही. अस्मिता अभिमानच्या घरी गेली तेव्हा अभिमान त्याच्या रूममध्येच बसून होता.. मघाशी आणलेला नाश्ता तसाच टेबलवर पडून होता.. अस्मिने मग मनोहर काकांना तो नाश्ता पुन्हा गरम करायला सांगितला आणि अभिमानला बळजबरीनेच खाऊ घातला.. थोडा वेळ अभिमानच्या घरी थांबून मग ते दोघे हॉस्पिटलला जायला निघाले.. ते गेटच्या बाहेर पडले असतील इतक्यात अभिमानला प्रसादचा फोन आला.

“हॅलो अभि...”

“हं प्रसाद.... कशी आहे आई ??”

“अरे तेच सांगायला फोन केला आहे. आनंदाची बातमी आहे.. काकींना आताच शुद्ध आली आहे.. आणि डॉक्टर म्हणाले की त्यांची प्रकृतीसुद्धा एकदम उत्तम आहे..”

“अरे वाह.. मस्त... आम्ही निघालोच आहोत हॉस्पिटलला यायला...”

“आम्ही... ???”

“म्हणजे मी आणि अस्मि... अस्मिसुद्धा आहे माझ्या बरोबर...”

“अच्छा... चालेल.. या तुम्ही आरामात.. काळजीचं काही कारण नाहीये आता...”एवढं बोलून प्रसादने फोन ठेवून दिला.

अभिमान काही बोलणार तोच अस्मि म्हणाली…

“कळलं… काही सांगायची गरज नाही. तुला जो आनंद झालाय ना त्या वरूनच कळलं मला काय ते.. चल आपण लवकर जाऊ हॉस्पिटलला…”

कधी एकदा हॉस्पिटलला जातो आणि आईला भेटतो असं अभिमानला झालं होतं. दोन दिवसांपासून त्याच्या चेहऱ्यावरचं टेंशन बरंचसं कमी झालं होतं. आईला भेटल्यावर त्याला जरा वाटलं. त्याच्या आईला बोलता येत नव्हतं पण खुणेनेच तिने आता मी बरी आहे असं अभिमानला सांगितलं.. अभिमानच्या डोळ्यात टचकन पाणी आलं. पण डोळे पुसत तो आईला म्हणाला

“आई…. लवकर बरी हो ग…. घराचं घरपणचं गेलंय…. बाबा पण आठवण काढतायेत तुझी…”

तेवढ्यात बाजूला असलेल्या नर्सने त्याला बोलू नका त्यांना आरामाची गरज आहे असं सांगून अभिमानला बाहेर जायला सांगितलं. त्याने आईकडे पाहिलं तर तिनेसुद्धा हसून मान डोलावली. तिच्या त्या हसऱ्या चेहऱ्याकडे पाहून अभिमान समाधानाने बाहेर पडला.

त्यानंतर एक दोन दिवस अभिमान आणि अस्मि हॉस्पिटलमध्ये येत जात होते. त्याच्या आईची तब्येतसुद्धा झपाट्याने सुधारत होती. पण डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे तिला अजून थोडे दिवस under observation ठेवणं भाग होतं.. ती थोडी थोडी बोलायला लागल्यावर अभिमानने त्याच्या डॅडला थोडी कल्पना देऊन आईशी फोनवर बोलायला दिलं होतं. तिच्याशी बोलल्यामुळे त्यांनीसुद्धा

एकदम टेन्शन घेतलं नाही पण ते लगेच भारतात निघून येणार होते. अभिमानाने त्यांना समजावून त्यांचं काम पूर्ण करूनच परत येण्यासाठी त्यांचं मन वळवलं.

पुढचा आठवडा अभिमानाने ऑफिसला सुट्टी टाकली.. अभिमान सुट्टीवर असल्याने अस्मिताला ऑफिसमध्ये जाणं गरजेचं होतं.. त्यांना नवीनच प्रोजेक्ट मिळालं होतं त्यामुळे ते थोडं महत्वाचं होतं त्यामुळे त्यांना ते लवकरात लवकर पूर्ण करायचं होतं. अभिमानवर असा प्रसंग आल्याने मग अस्मितानेच थोडीशी हिंमत दाखवून ते काम हळूहळू करायला सुरुवात केली. तरीसुद्धा ती संध्याकाळी जाताना हॉस्पिटलमध्ये वळून जायची.. कधी अभिमान असायचा तर कधी प्रसाद.. तिने कीती तरी वेळा अभिमानला सांगितलं की मी थांबते एखादं दिवस पण अभिमानाने तिला थांबू दिलं नाही.. आठवड्याभरात तिच्या तब्येतीत बराच फरक पडला. डॉक्टरांनी तिला भाताची पेज वगैरे द्यायला सांगितली. पहिल्या दिवशी मनोहर काकांनी बनवून दिली पण त्याच दिवशी मनोहरकाका घरातच पाय घसरून पडले.. आणि अभिमानची परत पंचाईत झाली.. अस्मिला स्वतःहून सांगणं त्याला योग्य वाटत नव्हतं.. पण अभिमानच्या मनाची होणारी चलबिचल पाहून अस्मिला शंका आली. तिने प्रसादला विचारलं तर प्रसादने तिला घडलेलं सगळं सांगितलं.

दुसऱ्या दिवशी अभिमान जेव्हा हॉस्पिटलमध्ये आला तेव्हा अस्मि आधीच आली होती. अभिमानला पाहून ती हसली. अभिसुद्धा बळेच हसला... अस्मिने आणलेली भाताची पेज तिने थंड करून ग्लासमध्ये घालून अभिमानच्या आईला दिली.

“आई.. तू ओळखलस का हिला.... अस्मिता.... एकदा आली होती बघ आपल्या घरी...”

“पाहिलं तेव्हा लगेच नाही ओळखलं... पण चेहरा थोडा ओळखीचा वाटत होता. मग हिने नाव सांगितलं तेव्हा लक्षात आलं.. पण अभिमान.. हिला कशाला उगाच एवढा त्रास दिलास.. मनोहरकाकांना सांगायचंस ना.... त्यांनी बनवली असती की पेज..”

“त्रास काय म्हणताय काकू.... पेज बनवायला कसला आलाय त्रास.. आणि तुम्हाला बरं वाटणं जास्त महत्वाचं आहे ना सध्या....”

“ अगं आई... मनोहरकाका पाय घासून पडलेत घरी...”

“अरे देवा.... काय एक एक संकटं मागे लागली आहेत... आता कशी आहे त्यांची तब्येत... फार लागलय का....”

“मुका मार लागलाय थोडा... आराम केल्यावर बरं वाटलं त्यांना.. आणि मी हिला नव्हतं सांगितलं.. हिला कुठून कळलं काय माहीत... कदाचीत प्रसादने सांगितलं असेल.. हो ना..”

अभिने अस्मिताला विचारलं.. अस्मिने हसतच मान डोलावली.

तेवढ्यात अस्मिला कोणाचा तरी फोन आला आणि ती बाहेर गेली. ती बाहेर जाताच अभिची आई अभिला म्हणाली..

“गोड आहे रे मुलगी... एवढं कोणी सख्ख्यासाठीसुद्धा करणार नाही...”

“आई... तुला ब्लडसुद्धा तिनेच दिलंय... कुठेच मिळत नव्हतं... पण ऐन वेळी अस्मि आली आणि तिने ब्लड दिलं.. आणि एवढे दिवस सारखी येत जात होती.. मलासुद्धा खूप धीर दिलाय तिने. ती नसती तर मी स्वतःला सावरुच शकत नव्हतो..”

“इतकी छान मुलगी... आणि तू तिला नाही म्हणालास अभिमान....”अभिमानच्या आईने नाराजीतच विचारलं.

“अग आई.. मी नाही नाही म्हणालो ग डायरेक्ट... पण तुलाही माहितीये ना.. मला आत्ताच या सगळयात नाही पडायचं... मला नाही गुंतायचं त्यात... मी याबद्दल विचारसुद्धा नाही केला कधी..”

“मग कर ना विचार... तिच्यासारखी मुलगी तुला दुसरी नाही मिळणार अभिमान.. तू तिचं मन दुखावलं असतानाही तिने तुला इतकं सांभाळलं.. तर ती तुझी अगदी नीट काळजी घेऊ शकते. आणि तुला सांभाळायला नेहमी कोणी तरी लागतं ते माहीत आहे मला...”

“हो.. आई.. पण...”अभिमान काही बोलणार तेवढ्यात अस्मिता आत आली. तिला येताना पाहून अभिमानाने विषय बदलला. मग अस्मिता, अभिमान आणि अभिमानची आई वरवर बोलत बसले.. थोड्या वेळाने अस्मिता जायला निघाली तेव्हा अभिमानच्या आईने तिला जवळ बसवून घेतलं आणि तिचे आभार मानले... अस्मि जेव्हा निघाली तेव्हा अभिमानच्या आईच्या डोळयात पाणी होतं.. ते पाहून अभिमानच्या हृदयात कालवाकालव झाली.. आपला निर्णय चुकला तर नाही ना असं त्याला क्षणभर वाटलं...

थोडे दिवसांनी अभिमानची आई घरी परत आली.. तेवढ्या वेळात अभिमानचे बाबांसुद्धा अमेरिकेवरून परत आले होते. बरेच दिवस अस्मिता प्रोजेक्ट एकटीच सांभाळत होती त्यामुळे आता अभिमानला ऑफिसला जाण भाग होतं.. सोमवारी तो ऑफिसला गेला आणि गेल्या गेल्याच जयच्या केबिनमध्ये घुसला.

"जय... आत येऊ का ?"

"अरे अभि... ये ना.. विचारतो काय.. आणि कशी आहे आता आईची तब्येत... ?"

"आता बरी आहे.. कालच आणलं घरी..."

"काळजी घे त्यांची..."

"हो.... ."

"हं... बोल... काय बोलत होतास..."

"जय... सॉरी..."

"सॉरी??? कशासाठी??"

"मी प्रोजेक्ट वर लक्ष नाही देऊ शकलो...."

"अरे.... सॉरी काय त्यात... प्रोजेक्ट काय येतच असतात.. एक झाला की दुसरा येतो.. पण आई एकच असते रे... तिच्या पुढे सगळी कामं, सगळं जग शून्य असतं.. आणि अस्मिताने सांभाळलं की सगळं.. तिने कामात अजिबात खंड पडू

दिला नाही... सो तू काही जास्ती विचार करत बसू नकोस... आता दोघेही मिळून लवकरात लवकर काम संपवून टाका.."

"हो.... थँक्स..."

"anytime my boy..."

जयशी बोलून झाल्यावर अभिमान त्यांच्या क्युबिकलमध्ये आला. आज त्यांना क्लायंटकडे जायचं नव्हतं.. त्यामुळे ते क्लायंटकडे असलेलं सगळं काम अस्मिने मागच्या आठवड्यात संपवलं होतं. अभिमान क्यूबिकलमध्ये आला तेव्हा अस्मि कॉम्पुटरमध्ये डोकं खुपसून काहीतरी करत होती. अभिमान आला त्याच्याकडे तिचं लक्षच नव्हतं.. थोडा वेळ गेल्यावर तिने त्याच्याकडे पाहिलं... एक छानशी स्माईल देऊन तिने परत कामाकडे आपलं लक्ष वळवलं.

"अभि... मी काय म्हणते... मी लास्ट वीकमध्ये जे काम केलंय ना ते एकदा पाहून घे ना.. काही बाकी असेल तर..."तिने अभिकडे पाहिलं तर त्याचं लक्षच नव्हतं... टेबलवर ठेवलेल्या पेपरवेटकडे एकटक बघत तो कसला तरी विचार करत होता.

"अभि.... अभि..."

"हं.... ."अभिने एकदम दचकून तिच्याकडे पाहिलं."काय झालं..."

“हे मी विचारायला पाहिजे... मी कधीपासून काही तरी सांगतेय आणि तुझं लक्षच नाहीये... कसला विचार करतोयस एवढा.. “

“अम्म्म.. नाही काही नाही.. तू बोल ना... काय सांगत होतीस..”

“कसला तरी विचार करत होतास हे नक्की... सांग बरं लवकर... तुला खोटं बोलता येत नाही अभिमान....”

क्षणात अभिमानच्या डोळ्यात पाणी आलं.. पण त्याने लगेच स्वतःला सावरलं..

“ अस्मि... thank you.. खरंच thank you...”

“ thank you??? कशासाठी???”

“तू माझ्यासाठी जे काही केलंस त्यासाठी....”

“मी तुझ्यासाठी थोडंच केलं हे सगळं.. हे सगळं मी माझ्या समाधानासाठी केलं...”

“पण तरीही ग... मी तू एवढं दुखावलं तुला.. आणि तू ते सगळं मनात न ठेवता....”

“ए hello.... आपण friends आहोत पहिले... नंतर बाकीचं... आणि जे काही झालं त्याचा affect आपल्या friendship वर कसा होऊन देईन मी... तू आता फालतूचे ड्रामे करू नकोस... कामावर लक्ष दे आधी.... अस्मिने लटक्या रागातच म्हटलं...

“बरं... राहिलं.... सांग... काय सांगत होतीस....”

“हा.. तर मी असं सांगत होते की.... .... .”अस्मिने विषय बदलला खरा पण कुठेतरी हा तिच्या मनातसुद्धा विचार येत होतेच.. पण तिने बरंच रडून मन हलकं केलं होतं.. मोठ्या मुश्किलीने तिने स्वतःला सावरलं होतं.. आपल्यात सगळं पहिल्यासारखंच आहे असं स्वतःच्या मनावर बिंबवून तिने नव्याने आयुष्य जगायला सुरुवात केली होती.

प्रोजेक्टच्या निमित्ताने त्या दोघांमधली मैत्री अजून फुलत गेली.. अभिमानला अस्मिची सवय कधी लागली त्याच त्यालाही कळलं नाही. सारखं त्याच अस्मिने हे केलं, अस्मिने ते केलं असं चालू असायचं.. त्यावरून त्याची आई त्याला खूप चिडवायची.... पण तो नेहमी हसण्यावारी न्यायचा.... त्यालासुद्धा अस्मिबद्दल काहीतरी वाटू लागलं होतं.. पण नक्की ती फक्त attachment आहे की प्रेम हे त्याच्यासाठी एक न सुटणारं कोडं होतं. जसजसे दिवस जात होते तसा तो अस्मिच्या अजून जवळ येत चालला होता. दोघांनी एकदम मन लावून काम केल्याने जय आणि त्यांचा क्लायंट दोघेही एकदम खुश होते. त्यामुळे क्लायंटने जय, अभिमान आणि अस्मि तिघांनाही त्या प्रोजेक्टच्या success पार्टीला बोलावलं. पार्टी क्लायंटच्या ऑफिसमधल्याच हॉल वर होती. आणि शनिवार होता त्या मुळे ऑफिसलासुद्धा सुट्टी होती. अस्मि सगळं आवरून खाली जाणार इतक्यात तिचा फोन वाजला.. तिच्या अपेक्षेप्रमाणे तो अभिचा फोन होता.

“हॅलो...”

“हा अभि... बोल....”

“अस्मि... संध्याकाळी पार्टीला येणार आहेस ना....”

“हो... आता एवढी मेहेनत केली आहे त्या प्रोजेक्टसाठी तर जायलाच हवं ना..”अस्मि हसतच म्हणाली.

“बरं... मग मी तुला घरून पिकअप करतो... एकत्रच जाऊ आपण...”

“अरे नको अभि... मला किती वेळ लागेल काही सांगता येत नाही.... तू पुढे जा... मी मागाहून येईन... आज आई एकटीच आहे ना तर तिला थोडी मदत करून येईन मी...”

“are you sure ???”

“ yes...”

“बरं ठीक आहे.. see you then.... take care...”

“हो.. बाय...”

आईला कामात मदत करता करता संध्याकाळ कधी झाली तिलाच कळलं नाही.. आईने आठवण कडून दिल्यावर तिला लक्षात आलं आणि मग घाई घाईतच तिने तयारी केली. तसंही तिला मेकअप वगैरे करायला फारसं आवडायचं नाही.. फक्त लाईट शेड ची लिपस्टिक आणि आय लायनर... एवढंच... त्यामुळे तिला

तयारी करायला फारसा वेळ लागला नाही. घराबाहेर पडून ती ऑटोची वाट पाहत स्टँडवर उभी होती.. एव्हाना अंधार पडायला सुरुवात झाली होती. सुदैवाने अस्मिला ऑटो मिळाली. पण थोडं अंतर गेल्यावर एक दोन धक्के खात ती ऑटोसुद्धा बंद पडली.

“क्या हुआ भैया..”

“मॅडम... गॅस संपला वाटतं...”

“गॅस संपला...”अस्मि जरा वैतागून म्हणाली..”असा कसा संपला... तुम्हाला आधी बघून नाही का घेता आला.. आधीच मला उशीर झालाय आणि त्यात हे असं... आणि इथून मला दुसरी ऑटो कशी मिळणार...”

“मॅडम सॉरी... पण तुम्ही दुसरी ऑटो बघा...”

“मी नाही बघणार.. तुम्ही मला दुसरी ऑटो मिळवून द्या...”

“मॅडम मी या एरियामधला नाही... माफ करा”असं म्हणून त्याने तिला जवळपास ignore केलं..

‘काय फालतू माणूस आहे.. डायरेक्ट उडवूनच लावलं याने मला... ‘ अस्मि मनात म्हणाली.

क्लायंटचं ऑफिस opposite साईडला असल्यामुळे तिकडे जायला कोणताही ऑटोवाला तयार होत नव्हता..

‘आता आली ना पंचाईत’ अस्मिने मनात म्हटलं. ‘ अभिमान सोबत जायला हवं होतं.. तो असला सोबत की कसलंच टेन्शन नसतं... त्यात अंधार पडायला

लागलाय. फोन करू का अभिला.. तो कुठेही असला तरी नक्की येईल.. नको... लगेच नको.. थोडा वेळ वाट बघूया.. जर नाहीच मिळाली ऑटो तर अभिला फोन करू.. ‘ तिने दहा पंधरा मिनिटे वाट पाहिली पण तिला ऑटो काही मिळाली नाही. ती अभिमानला कॉल करणार इतक्यात एक कार येऊन तिच्या समोर थांबली..

“अस्मि... तू इथे काय करतेय....”जयने खिडकीची काच खाली करत विचारलं.

“जय सर... अहो मी पार्टीलाच चालले होते पण ही ऑटो बंद पडली रस्त्यातच...”

“अच्छा.. आणि अभिमान कुठेय.... तुम्ही दोघे एकत्र नाही आज...”

“तो मला म्हणाला होता की मी येऊ का घ्यायला म्हणून.. पण मला उशीर होणार होणार होता म्हणून मग मी त्याला सांगितलं की तू पुढे हो.. मी येते नंतर...”

“अच्छा... चल बस... नशीब मलाही उशीर झाला.. कारण इथून जायला तुला ऑटो नाही मिळणार..”

“हो..”असं म्हणून अस्मि गाडीत बसली.

इकडे अभिमान कधीपासून अस्मिची वाट पाहत होता. बऱ्याच वेळा तिला फोन करावा असा विचार तिच्या मनात आला पण त्याने तो विचार आवरता घेतला. अस्मि येताना पाहून त्याची नजर जागच्या जागी खिळली.. निळया रंगाच्या गाऊनमध्ये अस्मि खूप सुंदर दिसत होती.. तिच्या गव्हाळ रंगावर निळा रंग खूपच खुलून दिसत होता.. केस मोकळे सोडले होते आणि केसांची एक बाजू

छोट्या पिना लावून घट्ट बसावली होती. चंदेरी रंगाचे कानातले छोटेसे झुमके तिच्या गव्हाळ रंगावर चमकून दिसत होते. डोळयांना फिकट निळसर रंगाचं आयलायनर लावून स्मोकि- आईजच्या मेकअपमुळे तिचे डोळे तिच्या चेहऱ्यावर आखीवरेखीव भासत होते. ओठांना फिकट गुलाबी रंगाचं लिपस्टिक तिचं रूप अजूनच खुलवत होती. काही क्षण अभिमान तिच्याकडे पाहतच राहिला.. जसा तिच्या मागून जय आला तशी त्याची तंद्री भंगली.. जय आणि अस्मिला एकत्र येताना पाहून त्याला जरा आश्चर्यचं वाटलं... अस्मिने दुरूनच त्याला हाय केलं.. त्यानेसुद्धा उत्तरादाखल त्याची नेहमीची स्माईल दिली. पण त्याच्या चेहऱ्यावर असलेलं प्रश्नचिन्हं अस्मिच्या नजरेतून सुटू शकलं नाही. हॉलमध्ये आल्यावर जय क्लायंटला भेटायला गेला आणि अस्मि अभिमानकडे आली.

“हाय... Sorry अभि.. मला जरा जास्तीच उशीर झाला यायला...”

“नाही गं.. जास्ती कुठे.... वेळेत आलीस तू... मला फक्त तासभर वाट पाहायला लागली इतकंच...”

अभिमानच्या नाराजीचा स्वर अस्मिच्या लक्षात आला.. मनातल्या मनात तिला हसूच आलं.. पण हसू ओठांवर दाबत ती म्हणाली

“तू चक्क इतक्या लवकर आलास.... स्वारीची उशिरा यायची सवय सुटलेली दिसतेय...”

“ए प्लिज... मी काय नेहमी मुद्दाम उशिरा येत नाही हा.. उशीर होतो तो....”

“मी कुठे असं म्हटलं की तू मुद्दामून उशिरा येतोस असं...”अस्मिता हसत म्हणाली.

अभिमान काही बोलणार इतक्यात जय आला.

“अरे अभि.. तू कधी आलास??”

“मला वेळ झाला येऊन... आज ट्रॅफिक नव्हतं ना.. तर लवकर पोहोचलो...”

“अच्छा... सॉरी यार.. तुला फार वेळ वाट पाहायला लागली का... मला वाटलं तू आणि अस्मि एकत्र असाल.. पण मला अस्मि रस्त्यात भेटली. तिची ऑटो बंद पडली होती. नशीब मी येत होतो त्या वेळेतच.. मग हिला घेऊन आलो..”

“अशा मोठ्या पार्ट्यांना बाईक वरून जायला काही लोकांना आवडत नाही ना...”अभिने टोमणा मारला.

अस्मिने चमकून अभिमानकडे पाहिलं. पण अभिमानच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले नाही. त्या नंतर बराच वेळ अभिमान अबोलच होता.. त्याचं काहीतरी बिनसलंय हे अस्मिच्या लक्षात आलं पण सगळयांसमोर ती त्याला काही विचारू शकत नव्हती. पार्टी रात्रभर चालणार होती. पण अभिचं हे असं वागणं पाहून तिला आता पार्टीमध्ये अजिबात रस राहिला नव्हता. जय त्याच्या इतर मित्रांसोबत बिझी होता. म्हणून मग शेवटी तीच अभिमानला म्हणाली.

“अभि... निघायचं आपण ??”

“आपण ???”अभिमानाने प्रश्नार्थक नजरेने तिला विचारलं.

“हो... आपण”

“पण तू तर कार मधून आलीस ना... मग कार नेच जा ना घरी. तुला गाऊनमध्ये बाईकवर नाही बसता येणार...”

“ओह कम ऑन अभि... काहीतरी बोलू नकोस... मला जय रस्त्यात भेटला आणि माझी ऑटो बंद पडली होती म्हणून मी त्याच्यासोबत आले.. नाहीतर मी माझी माझी ऑटोनेच आले असते.”

“मी त्याबद्दल कुठे काय म्हणालो.. मी फक्त इतकंच म्हणालो की तुला बाईकवर बसायला जमणार नाही सो तू जयच्या कार मधून जा.. तो सोडेल तुला घरी..”

“नाटकी करू नकोस... चल गप्पपणे...”असं म्हणून तिने बळेच त्याच्या हाताला धरून त्याला हॉलच्या बाहेर आणलं.

ते तिथून निघाले खरे पण अभि अजूनही गप्पच होता. शेवटी अस्मिनेच ती शांतता भंग केली.

“अभि... जरा साईडला थांबव गाडी...”

“काय झालं....”

“काही झालं नाही... तुला एकट्यालाच जायचं आहे तर तू जा.... काय गप्पच बसलाय तू कधीपासून... मी एकटीच बडबड करतेय...”

“अगं असं काही नाही...”

“काही नाही काय... अभि... तुला खोटं नाही बोलता येत... माहितीये मला... मी तुझ्याबरोबर न येता जय बरोबर आले म्हणून वाईट वाटलं ना तुला.. अरे पण खरंच मी ऑटोने येत होते. आणि माझी ऑटो रस्त्यात बंद पडली. मला जय सरांनी बघितलं आणि त्यांनी मला लिफ्ट दिली इतकंच...”

“हं....”

“हं काय.... . आणि काय रे.... तुला एवढं जळायला काय झालं....”अस्मिने हसून विचारलं.

“मी कुठे जळतोय....”

“दिसतंय ते.... अभि... असा का वागतोयस तू... असा अभि पहिल्यांदाच बघतेय मी....”

“बऱ्याच काही गोष्टी पहिल्यांदाच होतायेत ग... आणि त्या का होतायेत याचं उत्तर नाहीये माझ्याकडे...”

“अभि... हे बघ... आपण खूप आधीपासून मित्र आहोत... आणि मला तू आवडतोस म्हणून मी तुला प्रपोज केलं... तू तयार नाही आहेस या सगळयासाठी म्हणून तू नाही म्हणालास... कारण तू त्याबद्दल कधीच विचार केला नाहीस. मला सगळं मान्य आहे. पण मला नकार दिलास म्हणून मला वाईट वाटत असेल याचा विचार करून तू स्वतःला त्रास करून घेत असशील ना तर तो विचार पहिले मनातून काढून टाक. आपण मित्र होतो.. आहोत आणि राहू... कायम... कोणतीही गोष्ट मी आपल्या मैत्रीच्या आड येऊ देणार नाही.”

“अस्मि.... खरं सांगायचं तर....”

“सांग ना... मनात काहीही ठेवू नकोस...”

“नाही नको... आता नको...”

“सांगितलंस तर तुझंच मन हलकं होईल अभि...”

“नको... मला सांगावस वाटेल तेव्हा सांगेन मी... निघुया आपण??”

“निघायचं....”अस्मिने अभिच्या नजरेला नजर भिडवत विचारलं.

“तुला घरी जायला उशीर होईल अस्मि...”

“बरं.... चल...”

अस्मिच्या घरी पोहोचेपर्यंत दोघेही एकमेकांशी बोलत नव्हते. ती शांतता दोघांनाही असह्य होत होती पण बोलण्याचा पुढाकार मात्र कोणी घेत नव्हते.

घरी आल्यावरसुद्धा अभिच्या मनात अस्मिचेच विचार होते. तिचा तो स्मार्टनेस, तीच कामाबद्दलच डेडिकेशन आणि मुख्य म्हणजे कोणत्याही गोष्टीकडे पाहण्याचा तिचा पॉझिटीव्ह दृष्टीकोन या सर्व गोष्टी त्याला भावल्या होत्या. हे प्रोजेक्ट तिने त्याला प्रोपोज करायच्या आधी का नाही मिळालं असं त्याला राहून राहून वाटत होतं. त्यालाही आता ती आवडायला लागली होती पण आता तिचं उत्तर काय असेल याचा तो विचारही करू शकत नव्हता. कारण एकदा का कोणाचं मन दुखावलं कि मग नंतर कितीही मलमपट्टी केली तरी तरी त्याच्या खुणा कुठेतरी खोलवर राहतातच ना... अशा अनेक गोष्टी त्याच्या मनात येत होत्या.

शेवटी त्याने मनाशी ठरवलं कि उद्या अस्मिला सगळं सांगून टाकायचं.. लगेच त्याने अस्मिला मेसेज केला.

“अस्मि... मला थोडं बोलायचं होतं तुझ्याशी”

“हा बोल ना ! काय झालं”

“नको इथे नको ! उद्या कॉफीशॉपमध्ये भेटूया”

“उद्या... बरं ठीक आहे. किती वाजता?”

“संध्याकाळी. मी येईन तुला घ्यायला”

“अरे नको अभी.. उगाच तुला कशाला त्रास. मी येईन का ऑटो ने”

“त्रास कसला त्यात.... कारने तर येणार आहे.”

“संध्याकाळी ट्रॅफिक किती असता माहितीये ना माझ्या area मध्ये.. मी येईन ऑटो ने”

“बरं ठीक आहे. भेटू उद्या. ..”

आता अभिला प्रपोज करायच्या आधी अस्मिची जी अवस्था होती ती आता अभीची झाली होती. तिचं उत्तर काय असेल ? ती कशी react करेल या सगळ्या विचारांनी त्याची झोपचं उडाली होती. काय सांगेल ती ?? करेल का ती माझं प्रोपोजल accept. कि आधी मी तिला नाही म्हणालो म्हणून ती आता नाही म्हणेल.. नाही.. मी जसा काहीही न करता तिला नाही म्हणालो ती तसं नाही करणारं. ती व्यवस्थित विचार करून योग्य तोच निर्णय घेईल. कारण ती सगळ्या

गोष्टींचा अगदी खोलवर जाऊन विचार करते. माझ्यासारखा आतातयीपणे विचार नाही करत ती....

संध्याकाळी अस्मि नेहमीप्रमाणे लवकर येऊन त्यांच्या नेहमीच्या कॉफीशॉपमध्ये येऊन त्याची वाट पाहत बसली होती. साडेपाच वाजून गेले तरी याचा पत्ताच नव्हता. तसा तो कधी उशीर करत नसे कारण तो वेळेचा पक्का होता. पण आजचं का त्याला उशीर झाला. कि आम्ही भेटणार होतो हे विसरला तो. छे!! विसरेल कसा ? त्यानेच तर मला बोलावलं होतं. अजून थोडा वेळ वाट बघू नाहीतर मग फोन करून बघू. . अशी ती स्वतःचीच समजूत काढत होती. सहा वाजले तरी याचा काही पत्ता नाही तेव्हा मात्र तिला राहवेना. ती त्याला फोन करणार इतक्यात तिला मनालीचा फोन आला.

“हॅलो...”

“हॅलो अस्मि..”

“हा बोल मनाली.. आज कसा काय फोन केलास तू?”

“अस्मि कुठे आहेस तू ?????”

“मी जरा बाहेर आहे.. का गं काय झालं”

कॉफीशॉपमध्ये आहे सांगण्यापेक्षा बाहेर आहे हे सांगणच तिला जास्त योग्य वाटलं...

“तू लगेच सिटी हॉस्पिटलमध्ये ये..”

“सिटी हॉस्पिटल.. का काय झालं ?”

“तू पहिले ये ना.. मी काय ते नंतर सांगते तुला..”

“अगं पण...”

“लवकर ये.. मी वाट बघतेय..”

एवढं बोलून तिने फोन कट केला. आता काय करायचं अशा द्विधा मनस्थितीत ती सापडली. अभीचासुद्धा काही पत्ता नव्हता. शेवटी ती हॉस्पिटलमध्ये जायला निघाली. अभिला तिने तसा text करून ठेवला.

हॉस्पिटलमध्ये जाऊन पाहाते तर काय.. अभीचे आईबाबा, त्याचे मित्र आणि मुख्य म्हणजे मनाली.. सगळे तिकडे हजर होते. त्या सगळयांना बघून तिला धक्काच बसला. अभीला तर काही झालं नाही ना.. अशी शंका तिच्या मनात येऊन गेली. दुसऱ्याच क्षणी ती मनालीकडे धावली.

“मनाली.. काय झालं?”

“अस्मि ते...”

“अगं बोल ना... काय झालं?”

“अगं आज संध्याकाळी अभि कुठेतरी बाहेर जायला निघाला होता. निघताना त्याला अचानक चक्कर आली आणि तो खालीच पडला. टेस्ट केल्या आहेत.. रिपोर्ट आल्यावर कळेल काय आहे ते..”

“आता कसा आहे तो ?”

“शुद्धीवर आला आहे. पण डॉक्टरने त्याच्याशी बोलायला मनाई केली आहे..”

“मी निदान त्याला लांबून बघू तरी शकते ना ?”

“होय.. तुला बघितल्यावर त्याला बरंच वाटेल”

“हं.... ..”एवढं बोलून ती मध्ये गेली.

दोन दिवसांनी अभिच्या आजाराचं निदान झालं. त्याला ब्रेन ट्युमर झाला होता. लास्ट स्टेज. सगळयांच्या पायाखालची जमीनचं सरकली. अस्मिला तर काय करू आणि काय नको असं झालं होतं. त्याला असं काही होईल याचा ती कधी विचार पण करू शकत नव्हती. जरी तो नाही म्हणाला असला तरीसुद्धा तिला तो अजून आवडत होता. आता त्याच्याकडे फक्त थोडेच दिवस शिल्लक आहेत यावर तिचा विश्वास हि बसत नव्हता. तो कधीतरी तिचा विचार करेल हि वेडी आशा तर

मनात होतीच.. आणि त्याच्या सारख्या मुलाला असा काही आजार व्हावा हेसुद्धा तिच्या मनाला पटत नव्हतं.

दरम्यान मनालीने अभिमानकडे अस्मिचा विषय काढला.

“अभी..”

“काय झालं मनाली ?”

“निदान तू तुझ्या मनात काय आहे ते तरी अस्मिला सांगायला हवं”

“आता त्याने काय फरक पडतो मनाली. मी सांगितलं तर तिला खूप वाईट वाटेल. तिला मी आवडतो हे मला माहित आहे. मी तिला त्या दिवशी सांगणारच होतो. कि मलासुद्धा ती आवडते. माझं पण तिच्यावर खूप प्रेम आहे. पण बहुतेक नशिबालाच आमचं एकत्र येणं मान्य नसावं बहुतेक.”

“पण तरीही.. तू एकदा तिला सांगितलंस तर तिलासुद्धा बरं वाटेल”

“नाही नको.. ती मला आवडत नाही असंच तिला वाटू दे. मी गेल्यावर निदान तिच्या मनातून माझा विचार तरी जाईल... तिला जर खरं काय ते कळलं तर मला विसरणं तिला खूप जड जाईल. आधीच मी तिला नकार देऊन तिचं मन दुखावलं आहे. निदान जाताना तरी माझ्यामुळे तिला काही त्रास व्हायला नको एवढंच मला वाटतं. मला ती फक्त मैत्रीण म्हणून आवडते बाकी काही माझ्या मनात

नाही अशाच गैरसमजात तिला राहू दे. त्यातच तीचं भलं आहे. मला आता कितीही त्रास झाला तरी चालेल. पण माझ्या मुळे मी आता तिला त्रास नाही होऊ देणार... आपण ज्या व्यक्तीवर प्रेम करतो त्या व्यक्तीची काळजी घेणं, त्याला आनंदी ठेवणं हे आपलंच कर्तव्य असतं. आणि आता शेवटचे काहि दिवसचं का असेना मी ते पार पाडेन.... ."

"अरे पण तू पुढच्या आठवड्यात जाणार आहेस ना अमेरिकेला उपचारासाठी.. तू नक्की बरा होणार आहेस. तुला काही होणार नाही.. डोन्ट वरी.."

"मी बरा जरी झालो तरी पूर्णपणे बरा नाही होऊ शकणार मनाली.. माझ्या सारख्या पेशंटने प्रेम, लग्न अशा गोष्टींचा विचार न केलेला केव्हाही चांगलं... जिथे माझंच पुढे काय होणार हे मला माहित नाहीये तिथे मी तिचा विचार करू.. आणि माझ्यामुळे आयुष्यभर तिला दुःख का देऊ.."

"तुझं म्हणणं पटतंय मला पण.."

"आता जाऊ दे ना मनाली.... तूसुद्धा या सगळयाचा विचार नको करत बसू.. आपल्या नशिबात जे लिहिलंय ते होतं असं समजायचं आणि विसरून जायचं.."

"हं.... बरं चल... मी पण आता निघते... उशीर झालाय.. आणि हो... तुझ्या जेवणाचं काय???"

"ते आई घेऊन येणार आहे... so called पथ्याचं जेवण.."

“बरं.. ठीक आहे. काळजी घे.. आणि वाटलंच तर फोन कर..”

“हो नक्की.”

“बाय. टेक केअर...”

मनाली गेल्यावर अभिमान पुन्हा विचारात गढून गेला. त्याचं पण असं वागणं बरोबरच होतं म्हणा.. कॅन्सर किंवा ट्युमर झालेला पेशंट कितीही बरा झाला तरी त्याचे परिणाम आयुष्यभर राहतात. आणि शिवाय हा आजार परत केव्हा उद्धभवेल हेसुद्धा आपण छातीठोकपणे सांगू शकत नाही.. आणि अशा दुर्धर आजार झालेल्या मुलाबरोबर अस्मिने आपलं संपूर्ण आयुष्य काढावं असं त्याला अजिबात वाटत नव्हतं.. मुळात ते त्याला पटतंचं नव्हतं.. तसा तो लाखात एक होता.. कोणतीही मुलगी त्याला सहज होकार देऊ शकत होती.. अगदी अस्मिसुद्धा.. पण या आजाराने सारं काही बिघडवून ठेवलं होतं.

नंतरच्या दिवशी अस्मि जेव्हा अभिमानला भेटायला गेली तेव्हा त्याला पाहून तिच्या डोळ्यात चटकन पाणी आले.. अभिला अशा अवस्थेत बघावं लागेल याची कल्पनासुद्धा तिने कधी केली नव्हती.. अभिच्या चेहऱ्यावर असणार ते विलक्षण तेज केव्हाच लुप्त झालं होतं. चेहऱ्यावर सदैव असणारं ते हास्य कुठे तरी गायब झालं होतं. नेहमी बोलके असणारे डोळे खूप खोल गेल्यासारखे भासत होते.

अभिने तिच्याकडे पाहताच तिने पटकन रुमालाने डोळे पुसले आणि ती अभिच्या शेजारी जाऊन बसली.

“कसा आहेस अभी.... .”

“कसा वाटतोय... मस्त ना.. मग मस्तच आहे मी.. मला काय झालंय.. ह्या डॉक्टरांना सांगितलं की आता घरी सोडा मला पण हे काही माझं ऐकतचं नाही आहेत..”

तेवढ्या बोलण्यावरूनसुद्धा अभिचा जड झालेला आवाज अस्मिला जाणवत होता.

“सोडतील सोडतील.... तू बरा झाला आहेस अशी त्यांची खात्री पटली ना कि ते नक्की सोडतील तुला..”

“कसलं सोडतायेत मला ते.. पुढच्या आठवड्यात मला अमेरिकेतल्या कोणत्या तरी हॉस्पिटलमध्ये नेऊन टाकणार आहेत.. तीन चार वर्षे तिकडेच ठेवणार म्हणे... कसा राहणार मी चार वर्षे तिकडे एकटा.. इथे हॉस्पिटलमध्येसुद्धा मला एकट्याला किती बोअर होतंय.. आणि तिथे तर मी एकटाच.. काही खरं नाही माझं..”

“काही होत नाही... तू स्वतःची कंपनीसुद्धा छान एन्जॉय करतोस.. माहितीये मला..”

‘पण मला आता तुझी कंपनी हवी होती अस्मि... ‘ अभि मनात म्हणाला.

“काही म्हणालास का???”

“मी.. नाही ग.. मी हेच म्हणत होतो की आता मला तुम्ही सगळे नाही भेटणार ना लवकर... आणि फोन वगैरे पण नाही करता तिकडून.”

“काळजी नको करुस अभि... तू बरा होऊन आलास ना कि मग आपण पहिल्यासारखी खूप धमाल करू. बरं.. तू आता आराम कर.. जास्त बोलू नकोस...”

“जशी आज्ञा सरकार...”

“शी... सरकार काय... तुझं आपलं काहीतरीच...”

“हाहाहा..”

अभिचं ते खळखळून हसणं एकूण अस्मिला जरा बरं वाटलं. पण त्याच बरोबर तिच्या डोळयात पुन्हा अश्रूंनी गर्दी केली.. अभिला एकदा भरल्या डोळयांनी बघून तिने त्याचा तात्पुरता निरोप घेतला.

अभिला जेव्हा अमेरिकेला हलवण्यात आलं तेव्हा तिला त्याला भेटायला एअरपोर्टला जायची इच्छाच होईना. पण त्याला वाईट नको वाटायला म्हणून ती त्याला भेटायला गेली. त्याला निरोप देताना तिचे डोळे पाणावले. मोठ्या धीराने ती स्वतःला सावरत होती. समजावत होती. अभिला सोडून ती घरी यायला निघाली. रात्री उशिर झाल्याने त्यांचा मित्र अमोघ तिला घरी सोडायला आला.

बिछान्यावर पडल्यावर दिवसभराच्या थकव्यामुळे तिला झोप यायला हवी होती. पण खूप प्रयत्न करूनसुद्धा तिच्या डोळयाला डोळा लागत नव्हता.. सारखे मनात विचार येत होते..

‘ अभि तर गेला.. आता काय करू मी आहे तोच जॉब continue करून.... सारखी त्या ऑफिसमध्ये मला त्याची आठवण येत राहील... कामावर अजिबात लक्ष लागणार नाही.. आणि उगाच प्रॉब्लेम होतील.. त्यापेक्षा नकोच.. हा जॉब सोडलेलाचं बरा... ‘

दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये गेल्यावर ती सरळ जयच्या केबिनमध्ये गेली..

“सर... मी आत येऊ का???”

“अरे अस्मि... ये ना.. मी आता तुलाच बोलावणार होतो.. एक नवीन प्रोजेक्ट आलंय.. त्या संदर्भात”

“सर.... मी हा जॉब नाही करू शकत आता....”

“काय.... .”जयला धक्काच बसला... पण क्षणात त्याने स्वतःला सावरलं.

“का??? तू असा अचानक नोकरी सोडण्याचा निर्णय का घेतलास??? आणि तोसुद्धा आता तू पूर्णपणे सेट झाली असताना....”

“माफ करा सर.. पण याचं कारण नाही सांगू शकत मी तुम्हाला.... I am so sorry sir... पण हा जॉब सोडण्याशिवाय माझ्याकडे काही दुसरा ऑप्शन नाही आहे...”

“बरं... आता तू ठरावलंच आहेस तर मी काय बोलणार... पण तुला पुन्हा कधीही हा जॉब जॉईन करावासा वाटला तर तू तो करू शकतेस...”

“हो... थँक यू सो मच सर... येते मी... have a nice day..”

“yeah.. bye. And all the very best for your future..”

अस्मिला घरी लवकर आलेलं बघून तिच्या आईला नवलच वाटलं.. एरवी एवढ्या उशिरा येणारी मुलगी आज लवकर कशी आली..

“अस्मि... आज लवकर कशी काय आलीस तू ?? सगळं ठीक आहे ना...”आईने आपली काळजी व्यक्त केली.

“हो आई.. अग जरा कणकण वाटत होती म्हणून लवकर आले घरी.. आराम केला की बरं वाटलं.

आत्ताच खरं काय ते न सांगितलेलंच बरं... अस्मिने स्वतःशीच विचार केला. त्या दिवशी अस्मि रात्री जेवायलासुद्धा खाली आली नाही. आईने विचारलं तर तिने फक्त मला भूक नाही एवढंच सांगितलं.

सकाळचे आठ वाजत आले तरी अस्मि खाली येत नाही हे बघून तिच्या आईला जरा काळजीच वाटली. तिने अस्मिला हाक मारली तरी अस्मिचा काही प्रतिसाद आला नाही. झोप लागली असेल तिला असा विचार करून ती स्वतः अस्मिला उठवायला गेली.

“अस्मि...”

“हं....”

“हं काय... वाजले बघ किती.. ऑफिसला जायचं नाही आहे का??”

“आई.. मी जॉब सोडला...”

“काय...! जॉब सोडला?... असं अचानक...? आणि एवढा मोठा निर्णय घेतलास.. काही बोलली पण नाहीस तू...”

“आई... तुला कालच सांगितलं असतं तर तू रात्रभर तोच विचार करत बसली असतीस ना.. म्हणून नाही सांगितलं..”

“पण असं अचानक काय झालं...

“अचानक नाही ग.. बरेच दिवसांपासून विचार चालू होता.. काल सोडला मग.. आता नवीन जॉब शोधेन..”

“बरं... मला आणि बाबांना यातलं काही कळत नाही... तू बघ बाबा तुझं.. तुझं चांगलं तुला कळतं आता... आता मग उठणार आहेस की अशीच झोपून राहणार आहेस..”

“ उठते... तू हो पुढे.. मी येते फ्रेश होऊन...”

‘ आता लवकरात लवकर नवीन जॉब शोधावा लागेल. किती दिवस घरी बसून राहणार. कामात मन लागलं की मग सगळं हळू हळू विसरता येईल. जी गोष्ट आपल्या नशिबात नाहीच आहे ती काहीही केलं तरी मिळणार नाही. त्यामुळे जे आहे त्यात समाधान मानायला हवं. माझ्या लाईफमधले सर्वात सुंदर क्षण मी त्याच्याबरोबर शेअर आहेत. आमचा एकत्र प्रवास इतकाच होता असं समजायचं आणि नवीन आयुष्याला सुरवात करायची.. ‘ एवढं बोलून ती उठली. एक वेगळाच निर्धार तिच्या चेहऱ्यावर दिसत होता

अस्मिला आधीच्या कंपनीमध्ये कामाचा अनुभव असल्यामुळे तिला नवीन जॉब मिळण्यात काही अडचण आली नाही. ती आधी ज्या क्षेत्रात होती त्याच क्षेत्रात तिला जॉब मिळाला.

‘ आता लवकरात लवकर नवीन जॉब शोधावा लागेल. किती दिवस घरी बसून राहणार. कामात मन लागलं की मग सगळं हळू हळू विसरता येईल. जी गोष्ट आपल्या नशिबात नाहीच आहे ती काहीही केलं तरी मिळणार नाही. त्यामुळे जे

आहे त्यात समाधान मानायला हवं. माझ्या लाईफमधले सर्वात सुंदर क्षण मी त्याच्याबरोबर शेअर आहेत. आमचा एकत्र प्रवास इतकाच होता असं समजायचं आणि नवीन आयुष्याला सुरवात करायची.. ' एवढं बोलून ती उठली. एक वेगळाच निर्धार तिच्या चेहऱ्यावर दिसत होता.

अस्मिला आधीच्या कंपनीमध्ये कामाचा अनुभव असल्यामुळे तिला नवीन जॉब मिळण्यात काही अडचण आली नाही. ती आधी ज्या क्षेत्रात होती त्याच क्षेत्रात तिला जॉब मिळाला.

नंतर नंतर नवीन जॉबमध्ये तिने स्वतःला इतकं बिझी करून घेतलं की ती तिचा भूतकाळ जवळपास विसरूनच गेली.. तिने कोणत्या जुन्या मित्रांशी कॉन्टॅक्टसुद्धा ठेवला नाही. उगीच अभिच्या बाबतीत काहीतरी वाईट साईट ऐकण्यापेक्षा काही न ऐकणं तिला जास्त सोयीस्कर वाटलं. मध्येच तिला अभिची आठवण यायची.. पहिलं प्रेम कितीही काहीही केलं तरी विसरता येत नाही ना... आठवण आली की त्यांचे आधीचे फोटो बघायची.. कसा असेल अभि... बरं वाटलं असेल का त्याला.... अशी काळजी करत बसायची. बरं अभिच्या आईला अभिच्या तब्येतीबद्दल विचारावं तर तेवढी हिम्मत होत नव्हती. अभिमान जिथे कुठे असेल तिथे एकदम व्यवस्थित असू दे एवढीच प्रार्थना ती देवाकडे करायची.

इथे अमेरिकेत अभिची तब्येत सुधारत होती. डॉक्टरांनी अथक प्रयत्न करून आणि भारीतली भारी treatment देऊन अभिच्या मेंदूतली ट्युमर ची गाठ लेझरद्वारा काढून टाकली.. तो उपचारांना अगदी योग्य प्रतिसाद देत होता. थोडेच दिवसात तो पूर्णपणे बरा होईल अशी आशा डॉक्टरांना वाटत होती.

“अगं मी काय म्हणतो... जरा हा फोटो बघतेस का ?”

अस्मिच्या बाबांचं असं बोलणं ऐकून अस्मिसाठी पुन्हा एक नवीन स्थळ सांगून आलं आहे हे समजायला तिच्या आईला वेळ लागला नाही. दोन तीन महिन्यांपासून अस्मिचे आईबाबा अस्मिसाठी अनुरूप असं स्थळ शोधण्याचा प्रयत्न करत होते. काही चांगली स्थळ आलीसुद्धा पण अस्मिने हा नको, तो नको असं बोलून ती टाळली. पण कोणाला तरी आपल्याला हो बोलावंच लागणार आहे याची जाणीव तिला होती. त्यामुळे अधिक आढेवेढे न घेता ती त्या मुलाला भेटण्यास तयार झाली. रविवारी सुट्टी असल्यामुळे तोच दिवस ठरला.

आशुतोष पाटील.... एक नावाजलेला लेखक.... अस्मिनेसुद्धा त्याची एकदोन पुस्तके वाचली होती. अस्मिच्या बाबांच्या मित्रांकडून हे स्थळ आलं होतं. अस्मिने मुलाचा फोटो आणि नाव न बघताच त्याला भेटण्यासाठी होकार दिला होता. तिला तिच्या आईबाबांवर विश्वास होता त्यामुळे मुलाबद्दल अधिक जाणून घेण्याची तिला काही गरज वाटली नाही. पण समोर आशुतोषला बघून ती चकितच

झाली. पारंपरिक कांदेपोहे वगैरे चा कार्यक्रम झाल्यावर अस्मि आणि आशुतोष गार्डनमध्ये येऊन गप्पा मारत होते.

“अस्मिता.... एक विचारू???”

“हो.. विचार न...”

“बघ.. म्हणजे मला लिहिता खूप येतं पण समोरासमोर असं जास्ती बोलता येत नाही... म्हणून स्पष्टच विचारतो.”

“हो.. चालेल...”

“तुझं कोणावर प्रेम वगैरे आहे का.... म्हणजे.... तुला कोणी आवडतं....”

“Interview घेतोय का तू माझा...”अस्मि हसतच म्हणाली.

“नाही... तसं नाही.. तू प्लिज गैरसमज नको करून घेऊस.. मला तसं नव्हतं म्हणायचं....”

“अरे हो हो.. किती भांबावतोस.. लेखक ना तू..”

“हो म्हणजे...”

“कळलं मला... नाही माझं काही नाहीये बाहेर.... आधीच्या ऑफिसमध्ये आवडायचा मला एक मुलगा... पण आता काहीही नाहीये.. past तर सगळयांचा असतोच ना...”

“अच्छा... ठीक आहे...”

“तुझं आहे का तसलं काही ??”

“नाही गं... म्हणजे तसे अनुभव बरेच आलेत मला.. पण माणूस अनुभवातून शिकतो ना... मग त्या गोष्टींमध्ये नंतर कधी पडलोच नाही..”

“अच्छा... म्हणजे बराच experienced दिसतोयस तू....”

“बराच नाही.. पण थोडाफार..”

“हम्म... चांगलंय...”.

आज अस्मि आणि आशुतोषच्या लग्नाचा पाचवा वाढदिवस होता. आशुतोषचे आईबाबा शिर्डीला गेले होते त्यामुळे आज आशुतोषने बाहेरच जेवायला जायचा प्लान केला. तो, अस्मिता, आयुषी आणि अक्षत. आयुषी आणि अक्षत म्हणजे अस्मिता आणि आशुतोषच्या संसारवेलीवर फुललेली दोन नाजूक फुले. सगळं काही सुरळीत चालू होतं. पण नशिबात मात्र काही वेगळंच होतं.. समोरुन येणाऱ्या भरधाव ट्रकने त्यांच्या गाडीला जोरदार धडक दिली आणि सगळं होत्याचं नव्हतं झालं. त्याच अपघातात आयुषी आणि अक्षतची प्राणज्योत मालवली आणि आशुतोषलासुद्धा अपंगत्व आलं. त्या अपघाताने अस्मिच्या आयुष्याची दिशाच बदलून टाकली. पण तरीसुद्धा तिने मोठ्या धीराने ती परिस्थिती हाताळली. आशुतोषलासुद्धा सांभाळलं.

काही काळ गेल्यावर आशुतोषच्या आईने त्यांना मुलं दत्तक घेण्यासाठी सुचवलं. हो नाही म्हणता म्हणता अस्मि आणि आशुतोष दोघेही त्यासाठी तयार झाले. कारण दुसरा काही पर्यायच नव्हता. त्या एका अपघाताने त्यांचं जीवन पूर्णपणे बदलून गेलं होतं.

अस्मि आणि आशुतोष खोपोलीला असलेल्या अनाथाश्रमामध्ये गेले. ते येणार असल्याचं आधीच माहिती असल्याने आशुतोषचं मित्र केशवने त्याचं स्वागत केलं आणि त्यांनी आधी ठरवलेल्या मुलाला भेटण्यासाठी तो त्यांना बागेत घेऊन गेला. त्या मुलाला पाहताच अस्मि त्याच्या प्रेमातच पडली. थोडेसे लालसर केस, घारे डोळे, गोबरे गोबरे गाल... तिला तो खुप आवडला. श्रेयान.. श्रेयानच्या आईवडिलांचासुद्धा कार अपघातात मृत्यू झाला होता. त्याला सांभाळायला इथे कोणी नसल्यामुळे त्या हॉस्पिटलच्या डॉक्टरांनीच त्याला इथे आणून सोडलं होतं. तेव्हापासुन श्रेयान इथेच रमला होता. केशवने सगळं सांगितल्यावर अस्मिने त्याला प्रेमाने जवळ घेतलं आणि त्या गालाचा पापा घेतला.

पुढच्या फॉर्मलिटी पूर्ण करण्यासाठी केशव त्या दोघांना तो अनाथाश्रम जो चालवत होता त्याच्याकडे घेऊन गेला. दरवाजा ढकलून आत जाताच अस्मिची पावलं जागच्या जागी थबकली. समोर खुर्चीवर अभिमान बसला होता. या पाच सहा वर्षात त्याच्या दिसण्यात कितीतरी बदल झाला होता. डोळयावर जाड फ्रेमचा चष्मा, खुरटी दाढी, अर्धवट पिकलेले केस... आधी एकदम हँडसम असलेला अभि आता मात्र एकदमच अशक्त वाटत होता. अस्मिला इथे पाहून त्यालासुद्धा आश्चर्य वाटलं. केशवने त्याची त्या दोघांशी ओळख करून दिली. त्याने ओळख करून देताच अस्मिच्या चेहऱ्यावर हसू उमटलं.

“अभि.... . कसा आहेत तू??? आणि कधी आलास भारतात?? कोणाला माहितीसुद्धा नाही की तू परत आला आहेस ते...”

“कसा दिसतोय... मस्त ना... मग मस्तच आहे मी...”अभिमान नेहमीप्रमाणे हसत म्हणाला.”मला येऊन दोन वर्षे झाली आता... आणि परत आल्यावर हा अनाथाश्रम सूरु केला.. तुला तर माहितीच आहे.. मला बिझिनेस सांभाळण्यात कधीच रस नव्हता...”

“हो... पण परत आल्यावर सांगायचंस तरी....”

“मी विचार केला होता.. पण मग म्हटलं की तूसुद्धा तुझ्या आयुष्यात बिझी झाली असशील... तर उगाच कशाला तुला त्रास द्या...”

“त्रास कसला त्यात....”

आशुतोष गप्प बसून काय चाललंय ते बघत होता. मग अस्मिनेच त्याला सांगितलं.

“आशुतोष... मी आणि अभिमान कॉलेजपासूनचे मित्र आहोत.. पण नंतर हा अमेरिकेला गेला आणि मग कॉन्टॅक्ट तुटलं आमचं...”अधिक काही सांगणं अस्मिने टाळलं. थोडा वेळ बोलून आशितोष केशवबरोबर श्रेयानकडे गेला. आशुतोष गेल्यावर अभिमानाने विषयाला वाचा फोडली..

“अस्मि.... तुम्ही दोघं मूल का दत्तक घेताय?? तुला तर दोन मुलं आहेत ना.. मी बघितलं होतं फेसबुक वर....”अभिने प्रश्नार्थक नजरेने विचारलं.

अभिमानचा प्रश्न ऐकून अस्मि क्षणभर शांत बसली. आवंढा गिळत तिने घडलेला सर्व प्रकार अभिमानला सांगितला. ते सगळं ऐकून अभिमानलासुद्धा वाईट वाटलं पण शेवटी दैवापुढे कोणाचं काय चाललंय... आपल्याला स्वीकारवंच लागतं.

“तू लग्नाचा विचार नाही केलास....”

“मी... आणि लग्न.... .”

“हो.... हसायला काय झालं...”

“मी कोणत्या आजारातून गेलोय माहितीये ना तुला... माझ्या सारख्या माणसाने लग्नाचा विचार करणं म्हणजे दोन जणांचं आयुष्य बरबाद करण्यासारखं आहे...”

“अभि... काहीतरी बोलू नकोस....”

“अगं खरंच.... कशाला कोणाला उगाच बांधून ठेवायचं..”

“पण मग आता काय तू आयुष्यभर एकटाच राहणार आहेस का???”

“एकटा कुठेय मी... ही इतकी छान, गोंडस मुलं आहेत ना माझ्याबरोबर... खूप छान वेळ जातो माझा.”

“पण कोणाची तरी सोबत हवी ना अभि..”

“जिची सोबत हवी होती तिची तर नाही मिळू शकली ना...”

“म्हणजे. ... कोणाची...”

“नाही काही नाही.... .”

“अभि... तू नेहमी असंच करतोस... स्पष्ट असं काही सांगतच नाहीस.... त्या दिवशीसुद्धा तू मला काहीतरी सांगणार होतास ना.... तेसुद्धा अपूर्णच राहीलं....”

“काही गोष्टी न सांगितलेल्याच बऱ्या असतात अस्मि.... आपल्याला त्रास झाला तरी चालतो पण त्या गोष्टींचा समोरच्याला त्रास होता कामा नये....”

“बघ.. तू परत कोड्यात बोलतोय...”

“जाऊदे... तू फार विचार नको करू... श्रेयान खूप गुणी मुलगा आहे... अजिबात त्रास देणार नाही तुला...”अभिमानने विषय बदलला.

“अस्मि.... निघायचं ????”आशुतोष श्रेयानला उचलत म्हणाला.

“हो....”

पुन्हा एकदा तिने अभिमानकडे पाहिलं.

“येते...”

“हो...”काळजी घे..

“तूसुद्धा... आणि आता एकटा नाहीयेस तू.. आम्ही सगळे आहोत तुझ्यासोबत....”

“एकटेपणाची सवय झाली की मग एकटं वाटत नाही अस्मि”अभिमान नजर श्रेयानकडे वळवत म्हणाला.

“तू काही सुधारणार नाहीस... चल येते... भेटू लवकरच....”

“हो... बाय बाय....”

अस्मि श्रेयान आणि आशुतोष सोबत बाहेर पडली.. ते दिसेनासे होईपर्यंत अभिमान त्यांच्या पाठमोऱ्या आकृतींकडे पाहत राहिला.

समाधानाने.... .

------------समाप्त------------

प्रेम हे असंच असतं...

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.